आपल्या घरावर सौर पॅनल्स बसवा व नेट मीटरद्वारे वीज बिल करा शून्य...!!



सोलर नेट मीटरिंगची वैशिष्टे :-
- स्वत:ला आवश्यक वीज स्वत:च तयार करा.
- घरात वीज वापरुन शिल्लक वीज महावितरणला द्या. यामुळे आपले वीज बिल होणार शून्य.
- २५ वर्षांपर्यंत प्रोजेक्टची लाईफ
- आपल्या गुंतवणुकीचा परतावा २ ते ३ वर्षात.
- पर्यावरणाचा समतोल राखण्यास उपयुक्त.

पी एम सूर्यघर योजनेत ३ कि. वॅट पर्यंत ७८००० च्या सवलतीचा लाभ घ्या.

पी एम सूर्यघर योजना २०२४

| Average Monthly Electricity Consumption (units) | Suitable Rooftop Solar Plant Capacity | Subsidy Support |
|---|---|---|
| 0-150 | 1-2 kW | Rs. 30,000 to Rs. 60,000/- |
| 150-300 | 2-3 kW | Rs. 60,000 to Rs. 78,000/- |
| >300 | Above 3 kW | Rs. 78,000/- |

विनय सोलर
7448061112/7875560971
projects@vinaysolar.com
राजमळा, अलिबाग-रायगड

# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २४ जून २०२४

किंमत ४ ₹

विकणे आहे
महिंद्रा जिटो २०१८ मॉडेल
उत्तम स्थिती पासिंग २०२६ पर्यंत विकणे आहे.
पत्ता : साई-इन हॉटेल चोंढी, अलिबाग.
मो.नं. ९८८१५७५८१३

## जिल्ह्याला शाळा दुरुस्तीचे 'अर्थचक्र'

# ठेकेदाराचं चांगभलं

आविष्कार देसाई

। रायगड ।

**जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी हा शहरातील खासगी शाळांच्या विद्यार्थ्यापेक्षाही स्मार्ट व्हावा यासाठी शिक्षण विभागाकडून विविध उपक्रम राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेला तब्बल ९७ कोटी ४८ लाख ६४ हजार रुपयांची गरज आहे. सरकारकडे निधीच्या मागणीचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे, मात्र रक्कम मोठी असल्याने सरकारला देणे शक्य नाही. यासाठी दरवर्षी १० कोटी रुपये दिले जात आहेत, मात्र शाळा दुरुस्तीचे हे अर्थचक्र काही थांबायचे नाव घ्यायला तयार नाही. एकदाच नव्याने इमारत बांधल्यास दुरुस्तीवर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचण्यास मदत मिळणार आहे.**

सातत्याने शाळांच्या इमारतींची, वर्ग खोल्यांची डागडुजी करण्यात येत आहे. त्यामुळे ठेकेदारांचे चांगलेच फावत असल्याचे दिसून येते. दुरुस्तीसाठी दरवर्षी सुमारे १० कोटी रुपयांचा निधी मिळत असेल, तर यामध्ये संबंधीत ठेकेदार आणि प्रशासनाचे काही साटे-लोटे आहे का याचा देखील तपास होणे गरजेचे असल्याचे बोलले जाते.

पुरेशा निधीअभावी जिल्हा परिषदेच्या शाळा, वर्गखोल्या विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत होत्या. भिंती पडलेल्या, छत उडालेले दिसत होते. शाळांची दुरवस्था झाली होती. काही शाळांच्या संरक्षण भिंती जमीनदोस्त झाल्यात, तर काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसायला जागा नाही. शाळांची

| जि.प.ला 97 कोटींची आवश्यकता | 847 जीर्ण इमारती (76 कोटी) | 1258 मोठी दुरुस्ती (20 कोटी) |
|---|---|---|



> मुलांना दर्जेदार शिक्षण मिळणे हा त्यांचा हक्क आहे. यासाठी त्यांना आवश्यक असणाऱ्या शाळा तेथील वर्गखोल्या सुस्थितीत असणे गरजेचे आहे. काही शाळा, वर्गखोल्यांची अवस्था बिकट आहे. त्यामुळे दरवर्षी शाळा, वर्गखोल्यांची दुरुस्ती करावी लागते. याबाबतचा प्रस्ताव सरकारला सादर करण्यात येतो, मात्र पुरेसा निधी उपलब्ध होत नाही.
> – पुनीता गुरव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

अशी गंभीर परिस्थिती माहितीतून पुढे आली होती. सदरची परिस्थिती बदलण्याऐवजी पान २ वर

### शाळा, वर्गखोल्यांची दुरवस्था

१५ तालुक्यांतील ३१० शाळा आणि ५३७ वर्गखोल्या जीर्ण झाल्या आहेत. त्यासाठी ७६ कोटी ६६ लाख रुपये, तर ४५५ शाळांची आणि ८०३ वर्गखोल्यांची मोठी दुरुस्ती करावी लागणार आहे. यासाठी २० कोटी ८२ लाख रुपयांची आवश्यकता आहे. काही ठिकाणी कामे प्रगतीपथावर असून, उर्वरित कामे निधीअभावी रखडली आहेत. जिल्हा नियोजन समिती, समग्र शिक्षा या माध्यमातून निधी उपलब्ध होतो.

### शिळफाट्यावरील खळबळजनक घटना

## डोक्यात दगड टाकून पतीची हत्या



। खोपोली । प्रतिनिधी ।

नवऱ्याचे बाहेर अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून पत्नीने पहाटेच्या सुमारास तो झोपेत असताना डोक्यात दगड घालून हत्या केली. ही घटना रविवारी (दि. २३) खोपोलीतील शिळफाटा परिसरातील मीळ गाव नवीन वसाहतीत घडली. याबाबतची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. अरसद अली (३४) असे मयत पतीचे नाव आहे. पोलिसांनी कसून तपासाअंती संशयित पत्नीला बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेने शिळफाटा परिसरात एकच खळबळ

**■ संशयित पत्नीला ठोकल्या बेड्या**

उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, असरद अली (३४) हा उत्कृष्ट क्रेन ऑपरेटर असून, अनेक वर्षांपासून शिळफाट्यावर वास्तव्यास असल्याने सर्वांशी सलोख्याचे संबंध होते. सध्या तो शिळफाटा परिसरातील मीळ गाव नवीन वसाहतीत राहात होता. रविवारी पहाटे किंकाळीचा आवाज आल्यावर शेजारील लोक जागे होऊन बाहेर आले, पान २ वर

**आजचा अग्रलेख**
**आता चलाखी थांबवा**

## वेधक

### प्रज्वल रेवण्णाच्या भावालाही अटक

**नवी दिल्ली :** सेक्स स्कँडल प्रकरणात अटक झालेला जेडीएसचा माजी निलंबित खासदार व माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवण्णा याचा सख्खा भाऊ सूरज रेवण्णालाही आता अटक करण्यात आली आहे. जेडीएसच्या एका कार्यकर्त्याने सूरजवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला आहे. पीडित तरुणाने दिलेल्या तक्रारीनंतर सूरजला अटक करण्यात आली आहे. हासन जिल्ह्यातील होलेनारसीपुरा येथील पोलीस ठाण्यात सूरजविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सूरज रेवण्णा याने पीडित कार्यकर्त्याला त्यांच्या फार्महाऊसवर बोलावून त्याचा लैंगिक छळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### दोन जवान शहीद

**गडचिरोली :** छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यातील सिल्गर आणि टेकुलगुडमदरम्यान माओवाद्यांनी रविवारी दुपार तीनच्या सुमारास मोठा आयईडी स्फोट केला. या स्फोटात दोन जवान शहीद असून, काही जवान जखमी झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. विष्णू आर आणि शैलेंद्र अशी शहीद जवानांची नावे आहेत. या घटनेनंतर सर्वत्र खळबळ उडाली आहे. २०१ कोब्रा वाहिनीची ॲडव्हान्स पार्टी जागरगुंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कॅम्प सिल्गर येथून आरओपी ड्युटीदरम्यान ट्रक आणि मोटारसायकलने कॅम्प टेकलगुडेमकडे जात होती. त्यावेळी हा स्फोट झाला.

## उमटे धरणाची डागडुजी सेस फंडातून



। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाच्या नाकर्तेपणामुळे उमटे धरण गेल्या सहा महिन्यांपासून वादाच्या भोवऱ्यात सापडत आहे. धरणातील गाळाच्या प्रश्नाबरोबरच आता धरणाच्या भिंतीला पडलेल्या भगदाडाचा प्रश्न समोर आला आहे. जीर्ण झालेल्या भिंतीमुळे आजूबाजूच्या गावांना धोका निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे.

**■ जीर्ण भिंतीच्या भगदाडामुळे प्रशासन जागे**

त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासन तातडीने कामाला लागले असून, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी शुक्रवारी धरणाची पाहणी करून जिल्हा परिषद सेस फंडातून धरणाची डागडुजी करण्याचे निर्देश पान २ वर

### धरणाकडील रस्ता खडतर



उमटे धरणाकडे जाण्याच्या मार्गाची दुरुस्ती करण्यास जिल्हा परिषद अपयशी ठरले. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत या रस्त्याची दुरुस्ती केली जाणार आहे. उमटे धरणाकडे जाणाऱ्या सुमारे दीड किलोमीटर अंतरावरील रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. लहान-मोठे खड्डे व दगड या रस्त्यावर आहेत. उमटे धरणाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी शासनाकडून एक कोटी ९३ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र, अजूनपर्यंत या रस्त्याचे काम सुरु केले नाही. त्याचा फटका या मार्गावरील प्रवाशांसह नागरिकांना बसत आहे. रस्ता मंजूर असूनही रस्त्याच्या कामाबाबत कोणतीही हालचाल करण्यात आली नाही. त्यामुळे रस्त्याची अवस्था संबंधित ठेकेदार व प्रशासनावर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी माजी सरपंच मधुकर ढेबे यांच्यासह अनंता पाचांगे व ग्रामस्थांनी केली आहे.

## विधानसभा निवडणुका ऑक्टोबरमध्ये?

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता २० सप्टेंबरपासून लागू होईल आणि ऑक्टोबरच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात मतदान होईल, अशी शक्यता निवडणूक प्रक्रियेशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. बहुधा, राज्यातील विधानसभा निवडणूक एकाच टप्प्यात होईल, असे सांगण्यात आले आहे.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, २०१९ मध्ये २७ सप्टेंबर रोजी निवडणुकीची अधिसूचना जारी करण्यात आली होती. तर २१ ऑक्टोबर रोजी मतदान पार पडले होते. तर २४ ऑक्टोबर रोजी निकाल जाहीर पान २ वर

## मुनवलीतील तलावात दोन मुलांचा बुडून मृत्यू

। सोगाव । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील तलावात रविवार, दि.२३ जून रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास दोन मुलांचा पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मुनवली पंचक्रोशितील आठ मुलांचा ग्रुप मुनवली येथे वर्षासहलीसाठी आला होता. त्यातील अथर्व शंकर हाके, वय अंदाजे १६ वर्षे व शुभम विजय बाला, वय अंदाजे १५ वर्षे हे पोहत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला.

बुडालेल्या दोन्ही मुलांना



वाचवण्यासाठी सोशल मीडियावर आवाहन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील काही मुलांनी प्रतिसाद देत घटनास्थळी धाव घेऊन मुलांना शोधण्यात मेहनत घेतली असता त्यांना साधारण दोन तासांनी यश मिळाले. यामध्ये अथर्व हाके, रा. मुनवली याला पान २ वर

## नीट पेपरफुटीचे लातूर कनेक्शन?

**दोन शिक्षकांची चौकशीनंतर सुटका**

। मुंबई । प्रतिनिधी ।

वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षेत गैरव्यवहार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. यामुळे संपूर्ण देशभरात खळबळ उडाली आहे. आता नीटच्या पेपरफुटीप्रकरणी लातूर कनेक्शन उघड झाले आहे. या पेपरफुटी प्रकरणी महाराष्ट्रातून दोन शिक्षकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या (नीट) पेपरफुटीचे धागेदोरे आता खासगी कोचिंग क्लासेसची फॅक्टरी बनलेल्या लातूरपर्यंत पोहोचले आहेत. नांदेडच्या एटीएस पथकाने लातूरमध्ये दोन ठिकाणी छापेमारी केली आहे. याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या दोन शिक्षकांना अटक करण्यात आली आहे. संजय तुकाराम जाधव आणि जलील उमरखाँ पठाण अशी अटक करण्यात आलेल्या शिक्षकांची नावे आहेत.

पेपरफुटी प्रकरणात या शिक्षकांचा सहभाग असल्याचा संशय एटीएसला आहे. नांदेड एटीएसने या दोन्ही शिक्षकांना रात्री उशिरा ताब्यात घेतले. लातूरमध्ये राहणारे संजय जाधव हे मूळचे बोथी तांडा (ता. चाकूर) पान २ वर

## मैदानी चाचण्यांसाठी मंडप...



● पोलीस भरती प्रक्रियेत पावसाचा अडथळा येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. उमेदवारांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी जिल्हा क्रीडा संकुलातील १०० मीटरच्या धावपट्टीवर, तसेच गोळाफेक, लांब उंडीच्या मैदानावर वॉटरप्रूफ शेड उभारण्यात आली आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

## टेम्पो-कंटेनरचा भीषण अपघात

**कंटेनर चालकाचा मृत्यू**

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेलजवळील मुंबई-पुणे महामार्गावर मुंबई लेनवर कि.मी. ५.६०० येथे शिवकर गावच्या हद्दीत पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत टेम्पो आणि कंटेनरचा मध्यरात्रीच्या सुमारास अपघात झाला. यात कंटेनर चालकाचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

यातील आयशर टेम्पो क्रमांक एमएच ४७ वाय ४६४६ यावरील चालक बबलू नंदलाल यादव (४५, रा. चारकोप हिंदुस्तान नाका, कांदिवली-मुंबई) हे त्यांच्या ताब्यातील आयशर टेम्पो मुंबई-पुणे दुर्तगती महामार्गावर कि.मी. ५.६०० येथे शोल्डर पान २ वर


### अलिबागमध्ये सिकलसेल आजार जनजागृती

## लग्नापूर्वीच करा सिकलसेलची तपासणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शून्य ते ३० वयोगटातील व्यक्तींनी आरोग्य तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. प्राधान्याने विवाह योग्य गटातील स्त्री-पुरुषाने आवर्जून तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांनी केले. १९ जून हा जागतिक सिकलसेल दिन रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी साजरा करण्यात आला. अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात तपासणी व समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला रुग्णांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी रुग्णांना मार्गदर्शन करण्याबरोबरच त्यांच्यामध्ये सिकलसेल आजाराबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी पत्रक पान २ वर

**जिल्हा रुग्णालयातील समुपदेशन केंद्रामार्फत शिबिराचे आयोजन**



### हा आजार अनुवंशीक

सिकलेस हा आजार ज्या व्यक्तींच्या लाल रक्तपेशी विळ्याच्या आकाराच्या होतात, त्या व्यक्तींना सिकलेस आजार होतो. हा आजार अनुवंशीक असून, आई-वडिलांकडून मुलगा किंवा मुलीला या आजाराची लागण होते. विवाहापूर्वी रक्ताची तपासणी करणे गरजेचे असल्याचे समुपदेशन केंद्राकडून सांगण्यात आले आहे.

### सिकलसेल आजाराची लक्षणे

- रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होणे.
- भूक मंदावणे.
- हातापायावर सूज येणे.
- सांधे दुखणे, असह्य वेदना होणे.
- लवकर थकवा येणे.
- चेहरा निस्तेज दिसणे.

### सिकलसेल असा ओळखावा

- हातापायावर सूज येणे
- हिमोग्लोबीन नऊ टक्क्यांपेक्षा कमी असणे.
- अंगात बारीक ताप राहणे.
- डोळे पिवळसर दिसणे.
- सर्दी खोकला सतत होणे.

## प्रशांत पाटील यांच्या निधनाने पक्षाची मोठी हानी

**शरद पवार यांचे भावनिक उद्गार**

। उरण । वार्ताहर ।

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रामाणिक व एकनिष्ठ कार्यकर्ते होते. पक्षाला तळागाळात पोहोचविण्याचे काम प्रशांत पाटील यांनी केले असून, पक्षासाठी रात्रंदिवस झटणारा कार्यकता पक्षातून गेला, त्यामुळे पक्षाला मोठा धक्का बसला आहे. प्रशांत पाटीलसारखा सच्च्या कार्यकर्त्याच्या निधनामुळे पक्षाची खूप मोठी हानी झाली आहे, असे भावनिक उद्गार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक तथा नेते शरदचंद्र पवार यांनी उरण येथे केले.



प्रशांत पाटील यांचे २० जून रोजी आकस्मिक निधन झाले. त्या अनुषंगाने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यासाठी शरद पवार व त्यांच्या पत्नी प्रतिभा पवार यांनी उरण शहरातील कामठा येथील प्रशांत पाटील यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबियांचे सांत्वन केले. पान २ वर

# रायगड किल्ला पर्यटकांनी गजबजला

## दुतर्फा वाहन पार्किंगमुळे स्थानीकांची गैरसोय



। महाड । प्रतिनिधी ।

रायगडावर किल्ल्यावर पसरलेली धुक्याची झालर आणि आकर्षित करणारे पावसाळी वातावरण यामुळे पर्यटकांनी रायगड किल्ल्यावर एकच गर्दी केली होती. यातच रविवारची सुट्टी असल्याने रायगड किल्ला हाऊसफुल झाला होता. यावेळी येथे आलेल्या पर्यटकांनी रस्त्याच्या दुतर्फा वाहने लावल्यामुळे स्थानिक नागरिकांची वाहतूक व्यवस्था पुर्णपणे कोलमडून गेली होती.

रायगड किल्ल्यावर सप्टेंबरनंतर पर्यटनाचा हंगाम सुरू होत असतो. परंतु, यावर्षी ऐन जून महिन्यातच पावसाळी पर्यटनाला वेग आला आहे. पहिल्या पावसातच किल्ल्यावरील कोसळणारे धबधबे पर्यटकांना आकर्षित करत असल्यामुळे पावसाळी पर्यटन वाढले असून रायगड किल्ल्यावर जाण्यासाठी रोपवे आणि पायी चालत जाण्यासाठी पर्यटकांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या. यावेळी दोन ते तीन हजार पर्यटक रायगडावर दाखल झाले असून पाचाडपासून हिरकणीवाडी आणि पायथ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर पर्यटकांनी दुतर्फा वाहने लावल्यामुळे स्थानिक नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली होती. रायगडवाडी आणि त्यापुढे जाणाऱ्या स्थानिक ग्रामस्थांना वाट काढणे कठीण झाले होते.

पाचाड ते किल्ले रायगड यादरम्यान पर्यटक आपली वाहने रस्त्याच्या दुतर्फा लावतात. रोप-वेकडे जाणाऱ्या मार्गापासून चित्त दरवाजापर्यंत अरुंद रस्ता आहे. तसेच, येथील रस्त्यावर साईडपट्टी नसल्यामुळे वाहनचालक रस्त्याच्या मध्यापर्यंत वाहने पार्क करत असतात. यामुळे अन्य वाहनांना पुढे जाता येत नाही. किल्ले रायगडच्या पलीकडे रायगडवाडी, निजामपूर, वाघेरी, बावळे, कोळीआवाड हि गावे येतात. या गावातील लोकांना ये-जा करण्यासाठी खासगी वाहने तसेच एसटी सेवा उपलब्ध आहे. मात्र, पर्यटकांनी दुतर्फा लावलेल्या वाहनांमुळे एसटीला पुढे जाता येत नाही. यामुळे स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे वयोवृद्ध ग्रामस्थांना चित्त दरवाजा येथून निजामपूर, रायगडवाडी या ठिकाणी चालत जाण्याची वेळ येत आहे. महाड तालुका पोलीस ठाण्याअंतर्गत याठिकाणी एक पोलीस चौकी आहे. मात्र, याठिकाणी दुतर्फा वाहने लावून गेल्यानंतर व्यवस्था करणे कठीण होते.

### पार्किंग व्यवस्था मजबूती करणाची गरज

किल्ले रायगडावर यापूर्वी पावसाळ्यामध्ये कोणीच येत नव्हते. जून महिन्यापासून ते अगदी ऑक्टोबरपर्यंत या ठिकाणी फारच तुरळक पर्यटक दाखल होत होते. मात्र, आता पर्यटकांची गर्दी खूपच वाढली आहे. नुकत्याच झालेल्या शिवराज्याभिषेक सोहळ्यापेक्षाही अधिक पर्यटक रविवारच्या सुट्टीमध्ये किल्ले रायगडावर दिसून आले. यामुळे रस्ता रुंद करण्याबरोबरच पाचाड, रायगड वाडी या ठिकाणी उत्तम पार्किंग व्यवस्था करणे आवश्यक आहे.

# पुरोगामी युवक संघटनेचा पर्यावरणपूरक उपक्रम



। अलिबाग । प्रतिनिधी ।

बेलोशी पुरोगामी युवक संघटनेच्यावतीने रविवारी (दि.२३) सामाजिक उपक्रमांतर्गत 'झाडे लावा' या उपक्रमात एक हजार वनस्पतींची कोंडाचा माळ येथे लागवड करण्यात आली. तसेच, हजारो बियांचे रोपण करण्यात आले.

यावेळी संतोष वारगे यांच्यावतीने काही झाडे, सदानंद दुधाळे व मित्रपरिवाराकडून करंजाची ३०० झाडे तर कृषिविभाग व बेलोशी ग्रामपंचायतीकडून बांबूची रोपे पुरविण्यात आली. काजू, बदाम, बेल, वड, बांबू, मोहाची तसेच कडीपत्ता व करंज अशी जवळपास एक हजार पेक्षा जास्त झाडे तसेच, जांभुळ, चिंच, करंज, काजू, फणस या झांडाच्या हजारो बीयांचे रोपण यावेळी करण्यात आले.

संघटनेचे अध्यक्ष सुनील थळे, सचिव महेंद्र विद्रे, सदस्य सदानंद दुधाळे, सुर्यकांत वारगे, प्रसाद गुंड, संदीप वारगे, पांडुरंग वारगे, भगवान पाडगे, संतोष वारगे, प्रणित वारगे, निखिल वारगे, संदेश वारगे, रणधीर मढवी, केदार मढवी, सुधीर थळे, राहुल वारगे, प्रितेश भोपी या तरूणांनी वृक्षलागवड व बी रोपण करण्यासाठी खूप मेहनत घेतली. जागतिक तापमानात होत असलेली वाढ व ती वाढ रोखण्यावर वृक्षलागवड हा पर्याय याचा समतोल राखण्याकरीता बेलोशीच्या पुरोगामी युवक संघटनेने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

# अंजुमन महाविद्यालयातर्फे माझेरी येथे वृक्षारोपण




। कोर्लई । वार्ताहर ।

मुरूड येथील अंजुमन इस्लाम जंजिरा विज्ञान पदवी महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षलागवडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वृक्षलागवड कार्यक्रम अंतर्गत माझेरी गावातील रस्त्याच्या दुतर्फा सुमारे ६० विविध रोपांची लागवड करण्यात आली. यामध्ये आवळा, चिंच, करंज, कांचन, बांबू, बहावा, गुलमोहर अशी विविध प्रकारची झाडे लावून पर्यावरणाचे जतन व संगोपन करण्याचे काम महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. फिरोज शेख व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा.रहीम बागवान तसेच विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

पान १ वरून

## ठेकेदाराचं चांगभलं

त्यामध्ये वाढच होत आहे. नादुरुस्त शाळा दुरुस्तीसंदर्भात शाळा व्यवस्थापन समिती ग्रामपंचायत व पालकांकडून वेळोवेळी पाठपुरावा सुरु असतो. शासनाकडून दरवर्षी शाळा दुरुस्त्यांसाठी निधी प्राप्त होतो. नादुरुस्त शाळांची संख्या मोठी असल्याने निधी अपुरा पडत आहे. त्यामुळे यावर्षी शाळा, वर्गखोल्यांची दुरुस्ती केल्यानंतर पुढील वर्षी आणखीन नादुरुस्त शाळा, वर्गखोल्यांची संख्या वाढते. यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होत आहे. हा तात्पुरता उपाय असल्याने कायमस्वरुपी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

रायगड जिल्ह्यातील उरण आणि माणगाव तालुक्यात प्रत्येकी ३८ शाळांच्या इमारती जीर्ण झाल्या आहेत, तसेच अनुक्रमे ६७ आणि ४६ वर्ग खोल्यांचाही समावेश आहे. यासाठी सुमारे ६ कोटी १८ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे ४१ शाळांच्या इमारतींची आणि ७४ वर्गखोल्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करावी लागणार आहे. यासाठी नऊ कोटी ८० लाख रुपये असा एकूण १२ कोटी १९ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

| तालुका | (जीर्ण) शाळा/वर्गखोल्या | रक्कम |
|---|---|---|
| अलिबाग | २३/४२ | ६ कोटी १८ लाख |
| कर्जत | ३८/६७ | ९ कोटी ८० लाख |
| खालापूर | २१/३२ | ४ कोटी ४० लाख |
| महाड | ४१/७७ | ११ कोटी १६ लाख |
| माणगाव | ३८/४६ | ७ कोटी ७१ लाख |
| म्हसळा | १५/२४ | ३ कोटी ६७ लाख |
| मुरुड | १८/३८ | ६ कोटी १८ लाख |
| पनवेल | ६/१७ | २ कोटी १० लाख |
| पेण | ३२/५४ | ६ कोटी १० लाख |
| पोलादपूर | ११/२१ | २ कोटी ३१ लाख |
| रोहा | २६/४५ | ६ कोटी ७२ लाख |
| श्रीवर्धन | ११/२१ | ३ कोटी ७ लाख |
| सुधागड | १२/१९ | २ कोटी ८७ लाख |
| तळा | १५/३१ | ४ कोटी ३८ लाख |
| उरण | ३/३ | ४५ लाख |

| तालुका | (मोठी दुरुस्ती) शाळा/वर्गखोल्या | रक्कम |
|---|---|---|
| अलिबाग | ३०/६२ | १ कोटी २९ लाख |
| कर्जत | ४१/७४ | २ कोटी ३९ लाख |
| खालापूर | १९/३७ | ९३ लाख |
| महाड | ५७/९३ | २ कोटी ७४ लाख |
| माणगाव | ५५/८४ | १ कोटी ९८ लाख |
| म्हसळा | १९/३४ | ७४ लाख |
| मुरुड | १७/३८ | ६९ लाख |
| पनवेल | ४३/९७ | १ कोटी ८७ लाख |
| पेण | ४७/७५ | २ कोटी ४८ लाख |
| पोलादपूर | १९/३१ | १ कोटी ५५ लाख |
| रोहा | ३२/४५ | १ कोटी १४ लाख |
| श्रीवर्धन | १४/२१ | ५२ लाख |
| सुधागड | २९/४८ | १ कोटी ११ लाख |
| तळा | २३/४५ | ९४ लाख |
| उरण | १०/१९ | ४१ लाख |

## नीट पेपरफुटीचे लातूर कनेक्शन?

येथील रहिवासी आहे. ते सध्या सोलापूरच्या टाकळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. तर, लातूरच्या अंबाजोगाई रोड भागात राहणारे जलील उमरखाँ पठाण हे तालुक्यातील कातपूर येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक आहेत. संजय जाधव व जलील उमरखाँ पठाण हे दोघेही पीएचडीधारक आहेत.

नांदेडच्या दहशतवादी विरोधी पथकाने नीटच्या पेपरफुटी प्रकरणात लातूरमधून दोन शिक्षकांना अटक केली आहे. बिहारमधून १३ लोकांना अटक करण्यात आल्यानंतर महाराष्ट्रातूनही दोन लोकांना ताब्यात घेतल्यामुळे पेपरफुटी प्रकरणात महाराष्ट्राचे कनेक्शन आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. संजय तुकाराम जाधव आणि जलील उमरखाँ पठाण या दोन जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना नांदेड एटीएसकडून ताब्यात घेण्यात आले आहे. यापैकी एक शिक्षक लातूरमध्ये, तर दुसरा सोलापूरमध्ये कार्यरत आहे. नीट पेपरफुटी प्रकरणात आता दोघांचीही कसून चौकशी केली जात आहे.

## लग्नापूर्वीच करा सिकलसेलची तपासणी

वाटपदेखील करण्यात आले.

रायगड जिल्ह्यात आतापर्यंत सहा लाख ५० हजार नागरिकांची सोल्युबिलीटी तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ५०३ जण सिकलसेलचे रुग्ण आहेत. त्यात ४५६ रुग्ण सिकलसेल आजाराचे कॅरिअर रुग्ण असून, ४७ रुग्ण सफरर आहेत. आदिवासी लोकसंख्या जास्त असलेल्या तालुक्यांमध्ये ही रूग्णसंख्या आढळते. रायगड जिल्ह्यात अलिबाग जिल्हा रुग्णालय, कर्जत उपजिल्हा रुग्णालय आणि माणगाव उपजिल्हा रुग्णालयात सिकलसेल आजार तपासणी व समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत. जिल्ह्यात माणगाव व कर्जत तालुक्यात या रुग्णांची संख्या अधिक आहे, अशी माहिती समुपदेशन केंद्राकडून देण्यात आली आहे.

सिकलसेल आजाराला रोखण्यासाठी जिल्हा रुग्णालयामार्फत विविध उपक्रम राबिवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जागतिक सिकलसेल दिनानिमित्त बुधवारी (दि.१९) अलिबागमधील जिल्हा रुग्णालयातील सिकलसेल समुपदेशन केंद्रातर्फे सिकलसेल तपासणी व समुपदेशन शिबीर आयोजित करण्यात आले. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी सिकलसेल आजाराविषयी माहिती देऊन त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. दरम्यान, १२६ रुग्णांच्या रक्ताची तपासणी करण्यात आली. या शिबिरात सिकलसेल समुपदेशक प्रतिम सुतार यांनी सिकलसेलविषयी लोकांना माहिती देऊन मार्गदर्शन व समुपदेशन केले. सिकलसेल टेक्निशियन दिपा म्हात्रे यांनी रुग्णांचे रक्तसंकलन केले. सिकलसेल समन्वयक प्रीती पाटील यांच्या मेहनतीने कार्यक्रम यशस्वी झाले.

## डोक्यात दगड टाकून पतीची हत्या

तेव्हा त्यांना अरसदची पत्नी बाहेरील दरवाजात बसल्याचे दिसून आले. तर, मुलीचे हात रक्ताने माखलेले होते. दरम्यान, अरसदला जखमी असल्याची माहिती अपघातग्रस्त टीमचे गुरूनाथ साठेलकर यांनी मिळताच ते आपल्या टीमसह घटनास्थळी पोहोचले. घरात जाऊन पाहणी करताच अरसदच्या डोक्यात दगड टाकल्याने तो रक्ताच्या थरोळ्यात पडला होता. त्यानंतर गुरूनाथ साठेलकर यांनी सदर घटनेची माहिती खोपोली पोलीस ठाण्यात कळविताच घटनास्थळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे, पोलीस उपनिरीक्षक अभिजीत व्हरंबले पोलीस पथकासह घटनास्थळी पोहोचून तपासकार्य सुरू केले.

तपास करताना पत्नीची विचारपूस केली असता समाधानकारक उत्तरे मिळाली नसल्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी तपासाकरिता श्वान पथकाला पाचारण केले. श्वान सर्वत्र वास घेतल्यावर पत्नीजवळच जाऊन थाबंत होता. त्यानंतर फॉरेन्सिक लॅबच्या अधिकाऱ्यांनी घटनस्थळाची पाहणी करीत संशयित वस्तुंचे ठसे घेतले आहे. एलसीबीच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन तपासकार्य केले.

अरसद अलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी खालापूर ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आला आहे. सकाळपासून दुपारपर्यंत पोलिसांच्या सर्व यंत्रणेने तपास करीत भा.द.वि. कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे करीत आहेत.

## मुनवलीतील तलावात दोन मुलांचा बुडून मृत्यू

प्रथम शोधून बाहेर काढले, तर शुभम विजय बाला, रा. तुडाळ याला सुमारे अर्ध्या तासाने बाहेर काढण्यात यश मिळाले. घटनेची माहिती मिळताच अलिबाग पोलीस घटनास्थळी हजर होते. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत. घटना घडल्यानंतर घटनास्थळी पंचक्रोशितील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधानसभा निवडणुका ऑक्टोबरमध्ये?

झाला होता. आता आम्ही विधानसभा निवडणुकीची तयारी करत आहोत. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, अंतिम मतदार यादी २० ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. असेही अधिकाऱ्याने पुढे म्हटले.

निवडणूक आयोगाने २० जून रोजी महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड आणि जम्मू आणि काश्मीरमधील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. त्यांना १ जून २०२४ ही पात्र तारीख म्हणून फोटो मतदारयादीचा विशेष आढावा घेण्यास सांगितले आहे.

## उमटे धरणाची डागडुजी सेस फंडातून

संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना दिले.

उमटे धरणाची निर्मिती १९७८ साली करण्यात आली. त्यानंतर १९९५ साली हे धरण जीवन प्राधिकरणाकडून रायगड जिल्हा परिषदेला हस्तांतरीत झाले. धरणाची साठवण क्षमता ८७ दशलक्ष घनफूट आहे. पाण्याची शेवटची पातळी ४० मीटर, धरणाची उंची ५६.४० मीटर आहे. धरणाच्या पाण्यावर ४७ गावे व ३३ आदिवासीवाड्या अवलंबून आहेत.

उमटे धरणात गाळ साचल्याने पाणीटंचाईची समस्या दरवर्षी निर्माण होत आहे. ४० हजारांहून अधिक नागरिकांसमोर पाणी कपातीचे संकट उभे राहात आहे. या गाळाच्या प्रश्नाबाबत उमटे धरण संघर्ष समितीचे प्रमुख ॲड. राकेश पाटील व त्यांच्या टीम आवाज उठविला. त्यांना अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक व शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी पाठिंबा देत स्वखर्चाने गाळ काढण्याची तयारी दाखविली. त्यामुळे या धरणातील काही भागातील गाळ काढण्यास यश आले. शासनाच्या एक पाऊल पुढे जात सामाजिक बांधिलकीतून मदतीचा हात त्यांनी दिला.

४१ वर्षे जुन्या असलेल्या धरणातील दुरुस्तीकडे जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दुर्लक्ष केले. त्याचा परिणाम धरणाची दुरवस्था होण्यास सुरुवात झाली आहे. धरणाच्या बाह्य बाजूकडील भिंतीचे दगड मोठ्या संख्येने निखळले आहेत. त्यामुळे तेथील भिंतीला भले मोठे भगदाड पडले आहे.

ही समस्या निर्माण झाली असतानादेखील पाणीपुरवठा विभागाने दुरुस्तीकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे या विभागाच्या कारभाराबाबत नाराजीचे सूर उमटत आहे. उमटे धरणातील भिंतीला पडलेल्या भगदाडाची माहिती रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांना मिळाली. त्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून शुक्रवारी (दि.२१) उमटे धरणाची पाहणी केली.

यावेळी त्यांनी धरण मजबुतीकरणासाठी परिपूर्ण प्रस्ताव राज्य शासनाला सादर करण्याचे निर्देश संबंधितांना दिले. तसेच या पाहणी दौऱ्यात उमटे धरणाच्या भिंतीला पडलेले भगदाडाची तातडीने डागडुजी करण्याच्या सूचना दिल्या. डागडुजीसाठी आवश्यक निधी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी कदम, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता सुधीर वेगुर्लेकर, प्रल्हाद बिराजदार, निहाल चवरकर उपस्थित होते.

## प्रशांत पाटील यांच्या निधनाने पक्षाची मोठी हानी

याप्रसंगी शरद पवार यांनी आपल्या भावना व्यक्त करून प्रशांत पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी शरद पवार भावूक झाले होते.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस संतोष घरत, माजी आमदार मनोहर भोईर, जेएनपीटीचे विश्वस्त दिनेश पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस विकास नाईक, राष्ट्रवादीचे उरण विधानसभा अध्यक्ष गणेश नलावडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष मनोज भगत, शहराध्यक्ष मंगेश कांबळे, युवक कार्याध्यक्ष समाधान म्हात्रे, युवक अध्यक्ष सचिन पाटील, सामाजिक कार्यकर्ते समीर सुर्वे यांच्यासह प्रशांत पाटील यांच्या पत्नी, मुले, नातेवाईक, मित्र परिवार तसेच सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## टेम्पो-कंटेनरचा अपघात, एक ठार

लेनला थांबवून लघुशंकेला गेले. त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या कंटेनर क्रमांक एमएच ४३ बीएक्स ७९७६ यावरील चालक प्रियदर्शनी नायर (६०) याचे गाडीवरचे नियंत्रण सुटून पुढे शोल्डर लेनला उभा असलेल्या आयशर टेम्पोला पाठीमागून धडक देऊन अपघात झाला आहे. अपघातात कंटेनर ड्रायव्हरसमोरची काच फुटून ड्रायव्हर काचेतून उडून कंटेनरच्या समोर रोडवर पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. सदर जखमी इसमास आयआरबी ॲम्ब्युलन्समधील डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. मयत इसमाला खासगी ॲम्ब्युलन्सने पनवेल ग्रामीण रुग्णालयात पुढील कार्यवाहीसाठी नेण्यात आले आहे. अपघात ठिकाणी वाहतूक पोलीस स्टाफसह व आयआरबी कडील स्टाफ, देवदूत टीम, तसेच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस हजर होते. अपघातातील दोन्ही वाहने शोल्डर लेनला उभी करुन, त्यांना बॅरिकेटिंग करण्यात आले. त्यानंतर महामार्गावरील वाहतूक सुरळीत चालू करण्यात आली.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या मिळकती, मिळकतीचे खालील विदयमान मालक यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-घोटवडे, ता. सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र(हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| श्री. जॉन शिवी मॅथ्यु रा. रा. गोरेगाव पश्चिम | २२१/१ | ०-४६-०० | २.०३ |
| | २२१/४ | ०-१४-७० | ०.१९ |
| | २१५/४/ब | ०-१७-४० | २.१६ |
| | २२४/१ | ०-२०-२० | १.५३ |
| श्री. भिवा केश साळुंखे रा. ठाणे पश्चिम तर्फे अखत्यारी श्री. जॉन शिबी मॅथ्यु रा. गोरेगाव पश्चिम | २१५/४/अ | ०-१७-२० | २.१५ |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यानी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २४/०६/२०२४

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे भिलवले, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री. नंदकुमार रामकृष्ण वनवारी | ८८ | २ | ०२-३४-५० यापैकी विक्री केलेले क्षेत्र ००-७३-२६ | ७ | ३२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला,
साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक
(अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सही/-
**अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक:- २४/०६/२०२४ मो. नं. ९९२२३६८१२१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन श्री. राजेश रामदास कडू रा. हनुमान मंदिर जवळ, ९९, खारघर, गाव, सेक्टर १३, खारघर रायगड यांनी कायमचे खरेदी खताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - शिलारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| हरिकृष्णन वैद्यनाथन | ४५ | ४/अ | १-०४-०० | ० | ८२ |
| | या पैकी लिहून देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-२४-०० मात्र. | | | | |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड,सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- २४/०६/२०२४
मो. नं. ९१५८२७७७२८

निवडक

## एटीएम समस्यांच्या गर्तेत

**तळा** : तळा शहरातील मोदी तलावासमोर असलेले एटीएम समस्येच्या गर्तेत सापडले आहे. या एटीएममध्ये कधी कॅश नाही, कधी नेटवर्क नाही, यूपीएसचा बॅकअप नाही,तर कधी एटीएम मशीनमध्ये लाईट नाही अशा अनेक कारणांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. याशिवाय एटीएममधील दिवे बंद अवस्थेत आहेत. कित्येक महिन्यांपासून एसीदेखील बंद अवस्थेत आहे. नेहमी काही ना काही कारणास्तव हे एटीएम बंद राहात असल्याने एटीएम शोभेपुरतेच ठेवले असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## वडगाव येथे चित्रकला स्पर्धा

**पाताळगंगा** : जागतिक पर्यावरण दिन व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत रायगड जिल्हा परिषद शाळा वडगांव येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन माझी जबाबदारी, पर्यावरण संरक्षणात माझी जबाबदारी, या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ९० हुन अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रत्येक गटातून प्रथम व द्वितीय येणाऱ्या मुलांना रोख रक्कम,पारितोषिक गौरी महादेव गडगे, मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या वतीने देऊन गौरविण्यात आले.

## अष्टमी येथे महिलांचा सन्मान

**खांब** : ग्रुप ग्रामपंचायत तळवली तर्फे अष्टमी येथे सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीजच्या सीएसआर विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या गाव विकास प्रकल्प अंतर्गत महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने तळवली व चिल्हे गावातील ३१ महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. महिलांचे कुटुंब व्यवस्थेतील महत्त्व जाणून महिलांना गावपातळीवर उपजिवीकेचे साधन म्हणून युनिफॉर्म स्टिचींग प्रोजेक्ट संकल्पनेमध्ये महिलांनी सहभाग घ्यावा असे आवाहन सुदर्शन सी.एस.आर प्रमुख माधुरी सणस केले.

## कामाच्या पैशावरुन मारहाण

**पनवेल** : कामाचे पैसे दे असे बोलून मारहाण करण्याची धमकी व शिवीगाळ केल्याप्रकरणी आरोपी विजयकुमार यादव याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात अदखलपत्र गुन्हा दाखल करण्यात आला. यातील मुस्तकी अन्सारी हे बिल्डिंगचे काम करतात. ते आकुर्ली येथे राहत असून विजयकुमार यादव यांनी त्यांच्याकडे लेबरचे काम केले होते. विजयकुमार यांनी मुस्तकी यांना फोन करून कामाचे पैसे दे असे बोलून त्यांना मारहाण करण्याची धमकी दिली आणि शिवीगाळ केली.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**पाली/गोमाशी** : शिवयुवा प्रतिष्ठान कळबोशी यांच्या वतीने प्राथमिक शाळा खैरवाडी आणि आतोणे आदिवासीवाडी येथील गरीब आणि गरजू ८० विद्यार्थ्यांना शनिवारी (दि.२२) शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या शैक्षणिक साहित्यात वह्या, पाटी, पेन्सिल, दप्तर, छत्री, वॉटर बॅग यांचा समावेश होता. यावेळी संतोष भिलारे, हरिश्चंद्र भिलारे, शिवयुवा प्रतिष्ठान अध्यक्ष विनायक हुले, उपाध्यक्ष अजित भिलारे, खजिनदार शैलेश भिलारे, सचिव विपुल भिलारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# निगडी शाळेत निवडले शालेय मंत्रिमंडळ






### ईव्हीएम ॲपचा केला मतदानासाठी वापर

### विद्यार्थ्यांनी समजून घेतली निवडणूक प्रक्रिया

। म्हसळा । वार्ताहर ।

१५ जुन पासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून रायगड जिल्हा परिषद शाळा निगडी येथे शाळा पूर्व तयारी मेळावा क्रमांक २ आणि शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. शनिवारी (दि.२२ ) शाळेत ईव्हीएमसारख्या ॲपव्दारे प्रत्यक्ष निवडणूक घेऊन शालेय मंत्रिमंडळ नेमणूक करण्यात आली.

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया समजून देण्यात आली. विद्यार्थ्यांमधून उमेदवार निवडून प्रचार करणे, प्रत्यक्ष मतदान नोंदवहीत नाव नोंदवणे, हाताला शाई लावणे आणि प्रत्यक्ष ईव्हीएमवर मतदान करणे, निकाल पाहणे इत्यादी प्रात्यक्षिक उपक्रम घेण्यात आले. शालेय मंत्रिमंडळ निवडणूक जय शिवराय गट, राजमुद्रा गट आणि रायगड गट अशी तिरंगी लढत झाली. निवडणुकीनंतर निकाल जाहीर करण्यात आला. त्यात राजमुद्रा गटाने विजय मिळविला. स्पष्ट बहुमत न मिळाल्याने राजमुद्रा आणि रायगड गटाने युती करून मंत्रिमंडळ स्थापन केले. राजमुद्रा गट अध्यक्षा प्रज्ञा प्रदीप पाखड यांची शालेय मंत्रिमंडळ मुख्यमंत्रीपदी, उपमुख्यमंत्रीपदी समित संतोष भुवड तर शिक्षणमंत्री म्हणून वेदिका म्हांदळेकर तसेच विरोधी पक्ष नेता म्हणून आयुष जयवंत मोरे यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात निवडणूक प्रक्रिया पार पाडली. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मिलिंद मोरे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

निकालानंतर नवीन शालेय मंत्रिमंडळाचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले आणि शिक्षकांकडून त्यांना पुढील कामासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सदर निवडणूक पार पाडण्यासाठी विषय शिक्षक रामेश्वर पासले, सहशिक्षक भीम यादव यांनी निवडणूक अधिकारी तर मुख्याध्यापक रमेश जाधव यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पार पाडले. शिक्षणप्रेमी महादेव पाटील, सरपंच वेदिका पाखड, उपसरपंच जयवंत मोरे यांनी फोनवरून शुभेच्छा दिल्या. शाळेत असे नवनवीन उपक्रम कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल शाळा समिती, पालक यांनी अभिनंदन केले. शालेय मुख्यमंत्री प्रज्ञा पाखड आणि उपमुख्यमंत्री समित भुवड यांनी मतदार विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना दिलासा

### सिटीस्कॅन, डायलिसिस, रक्तपेढी आदी सेवा सुरू



। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव येथील बहूचर्चित उपजिल्हा रुग्णालयात विविध अत्याधुनिक तंत्रज्ञान सुविधा आणि सेवा कार्यान्वित झाल्या असून काही प्रमाणात वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची भरती पुरेशी झाल्याने रुग्ण, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या कडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

हे उपजिल्हा रुग्णालय १०० खाटांच्या मान्यतेचे असून मुंबई - गोवा महामार्गावर माणगाव येथे आहे. या रुग्णालयात दररोज ३०० ते ४०० रुग्ण आरोग्य तपासणीसाठी येत असतात. मात्र वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि आरोग्य सुविधा नसल्याने रुग्णांचे अतोनात हाल होत होते. त्यामुळे रुग्णांना खासगी दवाखान्यात अधिक रक्कम मोजून तपासणी आणि शस्त्रक्रिया करून घ्याव्या लागत असत. आता मात्र पुरेशा सुविधा उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. त्यामुळे रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे अशी माहिती सहायक अधीक्षक अविनाश साळवी यांनी दिली.

या रुग्णालयात सिटीस्कॅन मशीन सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे दाखल झालेल्या रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा मिळत आहे. तर खासगी रुग्णांना माफक दरात सिटीस्कॅन मशीनने तपासणी करून मिळत आहे. ही यंत्रणा एका कंपनीला देण्यात आल्याने रुग्णांना दिलासा मिळत आहे. हे सिटीस्कॅन मशीन सेंटर गेली पाच वर्षे धुळखात पडली होती. सरकारी सिटीस्कॅन मशीन कायमस्वरूपी बंद पडलेली होती. त्यामुळे रुग्णांना या मशीनचा लाभ मिळत नव्हता. आता लाभ होऊन रुग्णांच्या पैशांची बचत होत आहे.आता या रुग्णालयात रुग्णांना अत्यंत आवश्यक असलेल्या डायलिसिस सेंटर सुरू झालेले असून चार खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यासाठी पुरेसा कर्मचारी तैनात करण्यात आला आहे. सध्या किडनी रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

# तपस्वी रामजी लक्ष्मण घरत यांना अभिवादन



। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागचे नाव सातासमुद्रापार ब्रिटिश पार्लमेंटमध्ये सुवर्णाक्षरात कोरणार विद्यार्थीप्रिय शिक्षक तपस्वी रामजी लक्ष्मण घरत यांच्या १६९ व्या जयंतीनिमित्ताने अलिबागेतील सार्वजनिक वाचनालयासमोरील त्यांच्या अर्धपुतळ्यास प्रशांत नाईक मित्रमंडळ, तपस्वी रामजी लक्ष्मण घरत अर्धपुतळा परिसर सुशोभिकरण समिती, अलिबागचे निमंत्रक श्रीरंग घरत यांच्या उपस्थितीत सार्वजनिक वाचनालय, अलिबागचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

अलिबागचे माजी नगरसेवक आर.के. घरत यांच्या हस्ते याप्रसंगी तपस्वी रामजी लक्ष्मण घरत यांच्या अर्धपुतळ्यासमोर श्रीफळ वाढविण्यात आले. या जयंती समारंभास ज्येष्ठ नागरिक संघ अलिबागच्या उपाध्यक्षा चारुशिला शरद कोरडे, साहित्यिक उमाजी केळुसकर, ग्रंथालयाचे संचालक नवीन राऊत, ग्रंथपाल भालचंद्र वर्तक, संजय कांबळे, संतोष ठाकूर, सुदाम पाटील, अरविंद घरत, सतीश सुतार, जगदीश नागे, विकास पाटील, हेमकांत सोनार, द्वारकानाथ नाईक, बिपीन राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

## वेदक विद्यामंदिरचे परीक्षेत सुयश

**तळा** : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये झालेल्या मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर शाळेच्या सात विद्यार्थ्यांनी यश संपादन करून विद्या मंदिराचे नाव उज्वल केले आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बुद्धिमत्ता वाढीसाठी महत्वाची समजली जाणाऱ्या मंथन परीक्षेत गोपीनाथ वेदक महाविद्यालयातील इयत्ता पाचवीतील नित्य राजू खांडेकर, सहावीतील हर्षवर्धन धनंजय पवार, तेजस्विनी तानाजी भुरे, सई सुहास वावेकर, अदिती राकेश कासार, सातवीतील सार्थक कैलास वाडीकर व आठवीतील हर्ष राजू खांडेकर या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

# झाडांची छाटणी केली मात्र फांद्या तेथेच

### भिसेगाव जिल्हा परिषद शाळेची व्यथा



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहरात भिसेगाव येथे रायगड जिल्हा परिषदेची शाळा आहे. त्या शाळेच्या दोन इमारती अजून त्या इमारतींच्या बाजूला वाहणाऱ्या वीज वाहिन्या यांच्या आबाजुबाजुची झाडे महावितरण कडून जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तोडण्यात आली आहेत. १५ दिवसांचा कालावधी लोटला तरी तोडण्यात आलेली झाडे महावितरणकडून बाजूला काढण्यात आलेली नाहीत.त्याचा परिणाम शाळेतील विद्यार्थ्यांना आवरत तसेच मैदानात खेळण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.

भिसेगाव येथे रायगड जिल्हा परिषदेची शाळा असून त्या ठिकाणी पहिली ते सातवी पर्यंतची विद्यार्थी शिक्षण घेतात. हि शाळा रस्त्याच्या अगदी लागून असल्याने शालेच्या आवाराच्या बाजूने शालेच्या कुंपणाच्या वरच्या भागातून वीज वाहिन्या गेल्या आहेत.शाळेच्या आवारात गेली काही वर्षात सातत्याने वृक्षारोपण केले जात असल्याने शाळेच्या आवारात म ोठया प्रमाणात झाडे झाली आहेत. दरवर्षी महावितरणकडून वीज वाहिन्यांना लागणाऱ्या झाडाच्या फांद्या तोडण्यात येत असतात. तशाच प्रकारे जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महावितरणकडून झाडाच्या फांद्या भिसेगाव जिल्हा परिषद शाळा परिसरात तोडण्यात आल्या. त्यावेळी झाडणाच्या फांद्या आणि पालापाचोळा हा तेथेच टाकून ठेवण्यात आला.उद्या येऊन छाटलेल्या झाडांच्या फांद्या उचलल्या जातील असे सांगण्यात आले. त्यात त्यावेळी जिल्हा परिषद शाळा सुरु देखील झाल्या नव्हत्या.

ज्या दिवशी शाळा सुरु झाली त्यादिवशी शालेच्या आवारात असलेल्या झाडाच्या फांद्या यामुळे विद्यार्थ्यांना चालणे देखील कठीण होऊन बसले होते. शाळचा प्रवेशोत्सव असल्याने शालेच्या वरच्या वर्गातील विद्यार्थी आणि शिक्षक यांनी छाटलेल्या झाडाच्या फांद्या बाजूला करून घेतल्या. त्यानंतर त्याबाबत महावितरण कार्यालयात जाऊन झाडाच्या फांद्या काढण्याची सूचना पालकांनी केली.



● मुरूडलगत असलेले गाव एकदरा येथील कोळीबांधवांनी मासेमारी बंद करुन आपल्या बोटी गावासमोरील किनारी शाकारल्या आहेत. पाऊस येणार म्हणून गावाने हिरवी चादर पांघरली तशीच बोटींना पाऊसापासून संरक्षण म्हणून प्लॉस्टिकने बंद केल्या आहेत. (छाया : सुधीर नाझरे)

# कृषी संजीवनीसाठी विशेष मोहीम



। नेरळ । प्रतिनिधी ।

शेतकऱ्याला शेतीमधील बदलाच्या निमित्ताने महत्वाची भूमिका घेणारे शास्त्रज्ञ डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त कृषी संजीवनी पंधरवडा साजरा केला जात आहे. या निमित्ताने १७ जून ते एक जुलै या कालावधीत शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक उपक्रम राबविले जात आहेत.

यामध्ये बीज प्रक्रिया जनजागृती दिन, पी एम किसान उत्सव दिवस, जमीन सुपीकता बाबत जनजागृती, गुणवत्तापूर्वक निष्ठांची ओळख, पीक विमा जनजागृती दिवस, फळबाग लागवड, भात वर इतर महत्त्वाच्या पिकांच्या लागवड तंत्रज्ञाबाबत जनजागृती, महिला शेतकरी सन्मान दिवस, विविध योजनांची प्रचार व प्रसिद्धी, शेतकरी मासिक वाचन दिन व १ जुलै रोजी कृषी दिन साजरा करण्यात येणार आहे.कर्जत तालुक्यात गावनिहाय कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आलेले असून विषयनिहाय शेतकरी प्रशिक्षण वर्ग घेण्यात येत आहे.

## दुचाकीची चोरी

**पनवेल** : खांदेश्वर रेल्वे स्थानकाजवळील सार्वजनिक शौचालयाजवळ असलेल्या मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेल्या मोटार सायकलची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना घडली आहे.विक्रम गुलगे यांनी त्यांची दुचाकी सदर ठिकाणी उभी करून ते कामानिमित्त बाहेर गेले असताना अज्ञात चोरट्यांनी ती दुचाकी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# चेवणे पाणी योजना निकृष्ट दर्जाची

### संतप्त महिलांनी केली रायगड जिल्हा परिषदेकडे तक्रार



। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायतीमधील चेवणे गावातील जलजीवन मिशनचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. त्यात स्थानिकांना दोन ते चार दिवसांनी नळपाणी योजनेचे पाणी मिळत आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी या योजनेच्या कामाची चौकशी व्हावी अशी मागणी रायगड जिल्हा परिषदेकडे लेखी स्वरूपात केली आहे.चावणे गावातील कविता शेलवले, गीता पारधी, कृष्णा मेंगाळ, नैना मेंगाळ, ताराबाई शेलवले या सारख्या असंख्य महिलांनी पुढाकार घेऊन नळपाणी योजनेच्या कामाबद्दल शंका उपस्थित केली आहे.

चेवणे गावात सुमारे ३०-४० घरांची वस्ती असून येथे सर्व सम ाजाची लोक राहतात. या गावाला काही वर्षांपूर्वी आदर्श ग्राम पुरस्कार मिळालेला आहे. मात्र याच गावात जलजीवन मिशनचे निकृष्ठ दर्जाचे काम केल्याचे आरोप येथील ग्रामस्थ करताना दिसत आहेत.सन २०२२ मध्ये जलजीवन मिशनच्या कामाला सुरुवात करण्यात आली होती. या कामाची अंदाज पत्रकीय रक्कम सुमारे ८८ लाख असून हे काम अखेर मार्च २०२४ पर्यंत पूर्ण करण्यात आले.

या योजनेतून पाणी पुरवठा सुरु व्हावा यासाठी तात्पुरतंय स्वरूपात वीज जोडणी घेण्यात आली होती.त्यावेळी विहिरीत असणाऱ्या समरसिबल मीटर साठी तात्पुरत्या स्वरूपात वीज कनेक्शन जोडले आहे. परिणामी त्यामुळे गावातील वीज पुरवठा सातत्याने खंडित होतो. कामाला सुरुवात झाल्यापासून काम पूर्ण होई पर्यंत शासनाचे कोणतेच अधिकारी वर्गाकडून कामाची पाहणी करण्यात आली नाही असा आरोप ग्रांथ करीत आहेत. तशी नोंद ग्रामस्थांच्या सहीच्या अर्जात जिल्हा परिषद केलेल्या तक्रारीत केली आहे. नळपाणी योजनेचे काम पूर्ण होऊन पाणी पुरवठा सुरु झाल्यावर मागील अडीच महिन्यात फक्त १५-२० दिवस च पाणी सुरळीत चालू राहिले त्यानंतर मात्र सर्व ग्रामस्थ पाण्यापासून वंचित राहिले. त्यामुळे नित्कृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत समाविष्ट करा, अशी मागणी संतप्त ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदेकडे संबंधित विभागाला तक्रार करण्यात आली होती. मात्र अद्यापही कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आले नसल्याचे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे.

# रमेश कीर यांच्या प्रचारार्थ खारघरमध्ये मेळावा




। पनवेल । प्रतिनिधी।

लोकसभा निवडणुकीच्या अगोदर आदरणीय शरदचंद्र पवार यांनी सांगितले होते लोकसभेला महाविकास आघाडीला ३२ ते ३५ जागा मिळतील आणि महाविकास आघाडीला ३१ जागा मिळाल्या. या कोकण पदवीधर मतदार संघामध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कीर यांना विजयी करून कोकणावर लागलेला डाग पुसून काढण्याचा प्रयत्न करू या असे कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले, ते काल २३ जून २०२४ रोजी खारघर येथे आयोजित कोकण पदवीधर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश किर यांच्या प्रचाराच्या मेळाव्यात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर काँग्रेसचे आर.सी. घरत, पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, शिवसेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष शिरीष घरत, पनवेल काँग्रेसचे अध्यक्ष सुदाम पाटील, हेमराज म्हात्रे, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवा मडवी काँग्रेसचे कमांडर कलावत आदी मान्यवर उपस्थित होते.

# आता चलाखी थांबवा

आरक्षणाच्या प्रश्नात शिंदे व फडणवीस यांच्या सरकारने आजवर बरीच चलाखी करण्याचा प्रयत्न केला. आपण कशाही उलटसुलट भूमिका घेतल्या तरी जनतेला ते कळणार नाही व फायदा आपलाच होईल असा त्यांचा समज असावा. एरवी त्यांनी असा समज बाळगण्याला काही हरकत नसती. पण राज्यातील आरक्षणाची आंदोलने आणि प्रति-आंदोलने आता धोकादायक दिशेने जाऊ लागली आहेत. मराठा आणि ओबीसी समुदाय एकमेकांविरुध्द लढण्याच्या पवित्र्यात उभे दिसत आहेत. यात समजा एखादी ठिणगी पडली आणि याला हिंसक वळण लागले तर त्यात सर्व महाराष्ट्र होरपळून निघेल. त्यामुळे सर्व पक्षांचे राजकीय नेते तसेच कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांचे नेते यांनी आपापल्या समर्थकांना आवरण्याची व समजावण्याची गरज आहे. अमुक झाले तर या पक्षाचा फायदा होईल अशी गणिते मांडणे सर्वांनीच, विशेषतः शिंदे व फडणवीस सरकारने थांबवायला हवे. त्यामुळे बस्स झाले हे चलाखीचे खेळ असे त्यांना निक्षून सांगण्याची वेळ आली आहे. एखाद्या निर्णयामुळे एखाद्या पक्षाचा तात्कालिक फायदा होईलही कदाचित. पण त्यामुळे राज्याचे स्वास्थ्य व शांतता धोक्यात येणार असेल तर अंतिमतः त्यात सर्वांचेच नुकसान असेल हे राज्यकर्त्यांनी लक्षात ठेवावे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे गेले वर्षभरापासून उपोषणे करीत आहेत. जवळपास निद्रितावस्थेत गेलेला हा प्रश्न त्यांनी पुन्हा जिवंत केला यात शंकाच नाही. मात्र ते करताना त्यांनी जे डावपेच वापरले त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आरंभी ते मराठवाड्यातील कुणबी अशा नोंदी असलेल्यांना राखीव जागा देण्याबाबत आग्रही होते. मात्र त्याला पाठिंबा मिळताच त्यांनी मराठ्यांना ओबीसी कोट्यातूनच आरक्षण मिळायला हवे अशी मागणी पुढे केली. याबाबत ओबीसींमधून निषेधाचे सूर उमटायच्या आतच निवडणुका आल्या. त्यात सर्वच आंदोलने मागे पडली.

## तेव्हा जरांगे, आता हाके

आता निवडणूक निकालांनंतर जरांगे यांनी पुन्हा उपोषण सुरू केल्यावर ओबीसी समाजालाही आपले हित जपायला हवे याची जाणीव झाली. त्यातूनच लक्ष्मण हाके यांनी प्रति-उपोषण सुरू केले. कदाचित काही राजकीय नेत्यांनी ओबीसी समाजाला भडकावले असण्याचीही शक्यता आहे. पण त्यामुळे त्यांची भीती खोटी ठरत नाही. पन्नास टक्के आरक्षणामध्ये सुमारे २७ टक्के ओबीसींच्या वाट्याला आहे. त्यातूनचमराठ्यांसारख्या प्रबळ व संख्येने मोठ्या समुहाला आरक्षण दिले गेले तर ओबीसींचा वाटा घटणार हे उघड आहे. त्यामुळे ते चवताळून उठणार हे स्पष्ट होते.आता तेच घडले आहे.आणि, ही स्थिती येण्यास सर्वस्वी एकनाथ शिंदे यांचे सरकार जबाबदार आहे. मुळात जरांगे यांच्या आडून मराठा समाज आपल्यामागे उभे करता येईल असे शिंदे यांचे डावपेच होते. त्यामुळेच पहिल्या टप्प्यात जरांगेंचे महत्व वाढत जाईल अशा रीतीने शिंदे यांनी त्यांची खातिरदारी केली. त्यांच्यासाठी खास दूत पाठवले. वारंवार त्यांच्याशी फोनवरून संभाषण करून त्याला प्रसिध्दी मिळेल असे पाहिले. दोनदा ते जरांगेंचे उपोषण सोडवायला गेले. जरांगे यांच्या आग्रहाखातर सगेसोयरे अशी शब्दरचना सरकारी अधिसूचनेत केली. जरांगेंच्या संघटनेने त्यावर राज्यभर जल्लोष केला तेव्हा त्याचे सर्व श्रेय आपल्याला मिळेल अशी व्यवस्था केली. मात्र जरांगे यांनी तो मुद्दा लावून धरल्यावर त्यांची पंचाईत झाली. तिथून गणिते बदलली. मग जरांगे यांनी लोकसभा निवडणुकीत काही प्रमाणात आपला हिसका दाखवला. नंतर अलिकडे पुन्हा उपोषण सुरू केले. त्यांना शह देण्यासाठी हाके यांनी आंदोलन सुरू केले तेव्हा शिंदे आणि भाजपवाले पुन्हा त्यांना जरांगे यांच्याप्रमाणेच उचलून धरू लागले आहेत. मंत्र्यांची शिष्टमंडळे पाठवणे, शिंदे यांनी जाहीरपणे फोन करणे, मुंबईत उच्चस्तरीय आणि सर्वपक्षीय बैठक हे सगळे प्रकार पूर्वीच्याच रीतीने घडत आहेत.

## महाराष्ट्र भरडेल

मुळात जरांगे यांनी ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी केली तेव्हाच त्यांना रोखणे व कायद्यानुसार ते शक्य नसल्याचे सांगणे ही शिंदे यांची सरकार म्हणून जबाबदारी होती. ती त्यांनी पाळली तर नाहीच. पण संदिग्धता ठेवून राजकीय फायदा उठवण्याचा प्रयत्न केला.आरक्षण पन्नास टक्क्यांच्या वर नेण्याबाबतही अनेकांनी वाटेल त्या आशा समाजाला दाखवल्या. त्यातून शिंदे सरकारने दहा टक्के अधिकचे आरक्षण दिले. त्याला आव्हान दिले जाणार हे पहिल्या दिवसापासून स्पष्ट होते. बिहार सरकारने जातीय जनगणनेच्या आधारे दिलेले ६५ टक्के आरक्षण न्यायालयानेरद्दबातल ठरवले आहे. त्यामुळे दहा टक्के मराठा आरक्षणाचे भवितव्यही धोक्यात आहे. आरक्षणाची मर्यादा वाढवणे हे केंद्राच्या हातात आहे. मोदी सरकार त्यावर काहीही बोलण्यास तयार नाही. दुसरे म्हणजे मराठा मतांवर डोळा ठेवून चार महिन्यांपूर्वी सगेसोयरेबाबतचीजरांगेंची अट मान्य करण्यात आली. आरक्षण मिळालेल्यांच्या पत्नीकडच्या नातेवाइकांना आपोआप राखीव जागांचा फायदा देणारी ही तरतूद कायद्याला मान्य होणे कठीण आहे हे तेव्हाही स्पष्ट होते. तरीही ती पुढे रेटण्यात आली. आता हाके यांनी उपोषण सुरू केल्यावर शिंदे सरकार तिचा फेरविचार करणार आहे. याबाबत सर्वपक्षीय बैठकीत विचार होईल असे छगन भुजबळ काल म्हणाले. चहूकडून कोंडी झाल्यावर या सरकारला विरोधकांची आठवण झाली आहे.जरांगे यांच्या आंदोलनाच्या काळात कुणबी प्रमाणपत्रे किती मिळाली याचे रोज नवे हजारोंचे आकडे शिंदे जाहीर करीत होते. आता खोट्या प्रमाणपत्रांवर कारवाई करण्यात येईल असे स्वतः मुख्यमंत्रीच म्हणत आहेत. प्रमाणपत्र देण्यासाठी युध्दपातळीवरची मोहिम ही मुळातच एक धूळफेक होती. त्या मोहिमेत बरेच गैरव्यवहार झाले असण्याची शक्यता आहे. राजकीय स्वार्थापोटी समाजाच्या भावनांशी खेळण्याचा तो प्रकार होता. आज एकीकडे जरांगे तर दुसरीकडे हाके यांची इशारेबाजी चालू आहे. येत्या निवडणुकीपर्यंत हे असेच चालू राहील.स्वतःलामहाचतुर समजणारे शिंदे-फडणवीस हे स्वतःच स्वतःच्या जाळ्यात अडकले आहेत. त्याबद्दल दुःख वाटण्याचे कारण नाही. त्यात महाराष्ट्र मात्र हकनाक भरडला जाणार आहे.

विचार

# अवतरला हिरवा बहर

*वर्षभर पडणारा बेहिशेबी पाऊस ही हवामानबदलाच्या परिणामामुळे दिसणारी समस्या असली तरी सर्जनाचे मळे फुलवण्यासाठी येणारा मोसमी पाऊस मात्र एक वरदानच आहे. तो येतो आणि हिरवा बहर देऊन जातो. हा बहर जीवनप्रवाहाचा मुख्य सूत्रधार आहे. त्यामुळे केवळ मनुष्यच नव्हे तर चराचरातील प्रत्येक जीव आपापल्या पद्धतीने पर्जन्यसुक्त आळवताना दिसतो. त्याच्या फलिताचा हा काळ आहे. हा रम्य पाऊसकाळ आहे...!*

**स्वाती पेशवे**



नभ उतरु लागले आहे. एक आगळे झिम्माडपण अंगी घुमू लागले आहे. निसर्गातील हा बदल आपल्याला हिरव्या बहराकडे घेऊन जाणारा आहे. म्हणूनच तो उभारी देणारा आहे. हा बहर संपूर्ण चराचरामध्ये चैतन्य खेळवणारा आहे. शुष्कतेला हिरवाईमध्ये बदलवून टाकणारा आहे. त्यामुळेच या ऋतूपालटाला निसर्गचक्रात अपरंपार महत्त्व आहे. कदाचित त्यामुळेच असेल की, आपल्याकडे सण-समारंभांच्या पर्वाची सुरूवातच या ओलेत्या आणि गर्द मंडपाखाली होते.

आताही पाऊस सुरू झाला आहे. मत्त मेघांच्या झुंडी वेशीवर आदळू लागल्या आहेत. गर्जत, ललकारी देत, नाद करत हा चैतन्यरथ हळूहळू पुढे सरकेल आणि बघता बघता अवघा देश पादाक्रांत करेल. तो पुढे जाताना मागील प्रांत सुजलाम सुफलाम होत जाईल. ही समृद्धी सजीवांमधील जीवन प्रवाहित करणारी आहे. मातीआड लोटल्या गेलेल्या बीजांना फलनाचे दान देणारी आहे. तीव्र झळांनी भाजून, करपून गेलेल्या गवतकाड्यांमध्ये प्राण परतवणारी आहे. संपू पाहणाऱ्या, त्रासलेल्या, कष्टलेल्या आणि श्रांत-क्लांत झालेल्या कोणत्याही जीवाला; त्याच्या जगण्याला आशेचा एक थेंबही पुरेसा असतो. पाऊस ही आशा घेऊन येतो. पाण्याचे दोन-चार घोट तहानलेल्या जीवांना आधार देतात. ओंजळभर पाण्याचा हबका शिणलेल्या आणि थकलेल्या चेहऱ्यावर टवटवी आणतो. पाण्याचा तो झुळझुळता स्पर्श तनामनाची रखरख कमी करतो. ती स्नेहल सलगी आपल्या वृत्तींनाही तरल बनवते. असे असताना पावसाळ्यात तर आपण धारांची अविरत बरसात अनुभवतो. कुंद वातावरण, मधूनच अंधाराची माया दाटून आल्यानंतर सुटणारा बेभान वारा, त्या लयीत झोके घेणारे डेरेदार वृक्ष आणि अशा भारलेल्या वातावरणात मोठ्या दिमाखात बरसरणारा तो वरुणराज... गेले कित्येक दिवस आपण या वातावरणाची, ऋतूचक्रातील या बदलाची वाट बघत होतो. प्रत्येकाला समृद्धीचा सांगावा घेऊन घेणारा पाऊस हवा होता. तो आता आला आहे. त्याचे सहर्ष स्वागत करायला हवे!

पावसाची स्वत:ची अशी एक भाषा असते आणि ही भाषा कळणे हेच माणूसपणाचे लक्षणही असते. या भाषेत शब्द नसले तरी नाद आहे. लिपी नसली तरी दृश्यमानता आहे. शब्दांच्या त्या सुरेल ओळी जमिनीच्या धुळपाटीवर स्पष्ट वाचता येतात. ते नाचरे शब्दातून समोर येणारे गीत हृदयाच्या तारा छेडून जाते. त्यातील गेयता आणि सुरेलता थेट काळजाला भिडते. त्या शब्दांचा स्पर्श सर्वांगाला जाणवतो. म्हणूनच पावसाचे सुंदर गाणे होऊन जाते. कुणासाठी ते बडबडगीत असते तर कुणासाठी छानसे प्रणयगीत, कुणासाठी विरहगीत असते तर कुणासाठी भावगीत... भावनेप्रमाणेच संगीताच्या प्रत्येक शाखेमध्ये पाऊस आहे. कलेच्या प्रत्येक दालनात त्याचा मुक्त वावर आहे. तो स्वरात आहे, शब्दात आहे, पदन्यासात आहे, वाद्यांमधल्या तारांमधून निघणाऱ्या झंकारात आहे आणि नर्तिकेच्या भावमुद्रा तसेच हस्तमुद्रांमध्येही आहे.

पावसाच्या एक थेंबाने प्रफुल्लित झालेला कोणी चित्रकार त्याच्या समोरील कॅनव्हासवरही अथांग सागर रेखू शकतो तर अशाच जलधारा पंखांवर नाचवणारा चिमुकला पक्षी एखाद्या निष्णात नर्तकाला लाजवेल असे नाचू शकतो. कारण पावसाच्या धारांमुळे मिळणारी संजीवनी, नवचैतन्य आणि उन्माद आत्मिक आहे. त्यात कुठलीही कृत्रिमता नाही, परकेपणा नाही. तो स्वानंद आहे आणि स्वानुभूतीही आहे. ही अनुभूती घेण्यासाठी रानावनात फिरायलाच हवे, स्वच्छंद ढगांसवे बागडायला हवे, त्याच्यात मिसळून जायलाच हवे असे काही नाही. याचे आहे तसे रुप आपल्या अव्यक्त भावनांशी अगदी सहजतेने एकरुप होते. म्हणूनच शरीर कामात असले तरी तो येताच दबक्या पावलांनी बाजूला जात मन त्याच्या हातात हात मिसळून केव्हा येते हे आपल्यालाही समजत नाही. दूर असलो तरी त्याचा स्निग्ध स्पर्श सतत जाणवत राहतो. त्याची स्निग्ध सोबत सुखावत राहते. हलकेच त्याच्याशी कानगोष्टी सुरु होतात. पाहुण्यांच्या येण्यामुळे दिनक्रम बदलत नसला तरी वातावरण बदलते. एक प्रकारचा मोकळेपणा जाणवतो आणि साचलेल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली जाते. या लाडक्या पाहुण्याच्या आगमनानेही अगदी तसेच होते.

आजचा समाज पर्जन्यसुक्त गाणारा नाही. कुठलासा राग आळवल्यानंतर मेघांची गर्दी व्हायची आणि पाऊस कोसळू लागायचा या कल्पना त्याला भ्रामक आणि काव्यात्मक वाटतात. बेधुंद होऊन कोसळणाऱ्या पावसात समोरचा 'धबाबा कोसळणारा तोय' बघत समाधीस्त होणे त्याला शक्य नाही. वेगाने पळणाऱ्या कालचक्राशी स्पर्धा करण्यासाठी त्याला धावण्याचा वेग कायम राखणे गरजेचे आहे, नव्हे ते अपरिहार्यच आहे. म्हणूनच पावसाची संततधार त्याला सतावू शकते. जल ग्रहण करण्याची जमिनीची क्षमता अडवलेल्या या समाजाला मग काँक्रिटच्या रस्त्यांवर साठणाऱ्या तळ्यांचा त्रास होतो. सडपातळ होण्याच्या हट्टहासापायी शस्त्रक्रिया करुन घेताना एखाद्याचे आतडे शिवून टाकावे तसेच काहिसे आहे हे! पण काँक्रिट ओतून आतडे शिवल्यानंतर हा जीवनरस वाट फुटेल त्या दिशेने जाणार नाही तर काय करणार? तो तर आनंदाचे मळे फुलवण्यासाठी बरसला आहे. पण आपल्या करंटेपणाने सध्या तो बरसला की मळे नव्हे तर गटारे फुलतात. रंगीबेरंगी कमळ फुलवण्यासाठी पडलेल्या या पावसाच्या पाण्यात प्लास्टिक तरंगायला लागते. जागोजागी साठलेला कचरा पाण्यासवे वाहत जाऊन ठिकठिकाणी अडकतो आणि वेगाने धावणाऱ्या समाजाचे चक्र त्यात फसायला लागते. खरे तर हा गाळ त्याने स्वत:च निर्माण केला आहे. पण नाकातोंडात पाणी जायला लागले की आपण पावसाच्या नावाने खडे फोडून मोकळे होतो. थोडक्यात, वर्षानुवर्षाच्या अनुभवावरुनही माणूस काही शिकलेला नाही आणि कदाचित शिकणारही नाही.

एकेकाळी सार्वत्रिक असणारी कृषिप्रधानता आता मर्यादित झाली आहे. अनेकांची पाळेमुळे अगदी नावापुरती जमिनीमध्ये आहेत. अन्यथा, अनेकांनी कुंड्यामधल्या मातीतच बोन्साय होऊन जगणे पसंत केले आहे. बहरललेला, आखिव-रेखीव आकार असणारा, मर्यादित, शोभेपुरती पाने-फुले असणारा आणि खाण्यायोग्य नसणारी फळे मिरवणारा हा बोन्सायरुपी खुंटित समाज एक प्रकारे अलिप्ततावादी आहे, स्थितप्रज्ञ आहे. पाऊस पडला नाही तर कृत्रिम पावसाची तजवीज करण्याच्या तयारीत असणारा आहे. कमी पावसाच्या प्रदेशातही हिरवाई बहरते आणि उरात पेट्रोलची धग बाळगणाऱ्या जमिनीवरही समृध्दीचे मळे फुलतात, अशी उदाहरणे देणारा आहे. अशांना ढासळणाऱ्या पर्यावरण संतुलनाशी आणि कमी होणाऱ्या पाऊसकाळाशी काहीही घेणेदेणे नाही. जंगलांचा गळा आवळताना, नदीनाल्यांच्या माना मुरगाळताना, डेरेदार वृक्षांवरुन यांत्रिक करवती चालवताना आणि इंच इंच जमिनीवर बांधकाम करुन काँक्रिटची जंगले उभारताना त्यांना अजिबात वैषम्य वाटत नाही. उगवलेला दिवस ओरबाडून जगण्याच्या वृत्तीने झपाटलेली ही माणसे भविष्याचा विचार करण्यास तयार नाहीत. त्यामुळेच आजचे पावसाचे गाणे कधी कधी केविलवाणे होऊन जाते.

सर्जनशीलतेचे दान घेऊन आलेल्या या बहराच्या काळातच अनेकांवर काळाची झडप पडते. पोखरुन पोकळ केलेल्या डोंगराचे कडे ढपल्या पडाव्या तसे कोसळतात, भराव घालून आत दाबलेल्या पाण्यात वाहने वाहून जातात. धोकादायक परिस्थितीत असूनही वर्षानुवर्षे दुर्लक्षित झालेल्या इमारती पावसाच्या तडाख्यात भुईसपाट होतात. नियमांचे पालन न करता उभारलेली अजस्त्र होर्डिंग कोसळून सांगाड्याखाली काहींचे जीव जातात तर काही जन्मासाठी जायबंदी होतात.

उघड्या गटारातून वाहून गेलेल्यांचे मृतदेह दूरवर कुठे तरी सापडतात, तेव्हा त्या दुर्घटनेची चर्चा होते. साचलेल्या पाण्यात विजेचा प्रवाह उतरतो, एखाद्या खांबावर स्थिरावतो आणि काहींचे जीव घेऊनच थांबतो. पावसाला अशा अपघातांची आता सवय झाली असावी, कारण हे वर्षानुवर्ष घडत आहे. मात्र ही परिस्थिती तात्काळ बदलण्याची भाबडी आशा बाळगण्याचेही काही कारण नाही. अर्थातच या सगळ्यात ऋतूराजाची काहीही चूक नाही. हजार हातांनी दिले जाणारे दान घेताना एखाद्याची झोळीच तोकडी असेल तर तिथे दात्याचा दोष नाही तर तो अशा करंट्या माणसांचा आहे. तो नेहमीच्या उन्मादात येणार, छतावर ताडताड बरसणार, शेताशिवारात बेभान कोसळणार आणि सृजनाचे मळे फुलवणार. त्यासवे आपण फुलायचे की उन्मळून पडायचे हा ज्याचे त्याने ठरवावे.

आजकाल

# देश वाचला चर्च आपण वाचू, अन्यथा कपाळमोक्ष

**आनंद शितोळे**

मॉर्गन स्टॅनले या संस्थेच्या सर्वेक्षणात आलेले निष्कर्ष.

२०२० या वर्षात ५००० लक्षाधीश व्यक्तींनी भारत सोडून इतर देशात कायमच स्थायिक होण्याला प्राधान्य दिलेलं आहे.

२०१४ पासून आजवर २३००० लक्षाधीश व्यक्तींनी देश कायमचा सोडलेला आहे.

२०२० या एकाच वर्षात ५००० आकडा मोठा आहे.

पैकी अनेकांनी आपापले व्यवसाय कदाचित इथे सुरु ठेवले असतील पण राहण्यासाठी कुटुंब घेऊन परदेशात गेले असतील.काहींनी सगळच आवरून रामराम ठोकलेला असेल.

यांना पळपुटे म्हणून खिजवणे मला योग्य वाटत नाही.

आपल्या गावात, जिल्ह्यात, राज्यात राहायच्या लायकीच काही उरल नाही म्हणून स्थलांतर करत, पोटापाण्याचे उद्योग धुंडाळत आपल्या मागल्या पिढ्यांनी अशीच गाव सोडली, कुणी राज्य सोडली आणि नव्या ठिकाणी आयुष्याचा श्रीगणेशा केला.

या लोकांना संपूर्ण देशाकडून, सरकारकडून आलेल्या अनुभवाने , इथली सिस्टीम, कररचना, मार्केटची स्थिती या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणून देश सोडावा वाटला असेल.

कदाचित त्यांची ऐपत आहे आणि तुमची माझी नाही.

आपली ऐपत नाही म्हणून आपण देशभक्तीचे गळे काढण्यात काहीही अर्थ नाहीये.

या आकडेवारीचे काही सोपे सरळ थेट अर्थ निघतात.

सर्वसामान्य उद्योजकांनी इथल्या व्यवस्थेकडून म्हणजेच सरकार कडून काही सकारात्मक घडून लोकांची क्रयशक्ती वाढून व्यापार उदीम बरा होईल हि आशा सोडलेली आहे.

लक्षात घ्या, हि मंडळी पैशाची ताकद असलेली आहेत, पैसे मोजून सवलती, परवानग्या पदरात पाडून घेणे अवघड नाही, यांना बँकांची कर्जे सहज मिळतील.

पण हे सगळ असल तरी एक बाजाराचा नियम आहे.

" जहाज बंदरावर नांगर टाकून ठेवलेलं असल कि ते सर्वात सुरक्षित असत पण सुरक्षित बंदरात ठेवायला जहाज बनलेलं नसत "

व्यापार लोकांनी खरेदी विक्री करण्यावर चालतो, उद्योगांना नफा कमवणे, व्यापार करणे, त्यामध्ये धोके पत्करणे या गोष्टी हव्या असतात. पैसे मोजून कर्जे मिळतील, परवाने मिळतील , कारखाने उभे राहतील पण त्यातून बनणारे उत्पादन खरेदी करण्याची क्रयशक्ती असलेला ग्राहकच बाजारातून गायब असेल तर हे डोलारे कुचकामी आहेत.

देशातील असुरक्षित वातावरण, मुठभर नव्हे एका हाताच्या बोटावर मोजतील एवढ्याच समूहांना सरकारची सगळी काम आणि सगळी खैरात, उरलेल्यांच्या मागे सरकारी ससेमिरा, मोठ्या माश्यांच्या अनुकूल कायदे आणि सरकारचे निर्णय यामुळे आपल्याला या देशात भवितव्य नाही याची खात्री झाल्याने यांनी देश सोडण्याचा निर्णय घेतलेला आहे.

दुसरी बाब म्हणजे होऊ घातलेल्या येऊ घातलेल्या एकधर्मीय राष्ट्राच्या पिपाण्या ढोल वाजवले जाताहेत त्यामध्ये देशातल्या इतरधर्मीय नागरिकांचे नेमके स्थान काय असेल ? त्यांना देशात राहू दिले जाईल कि बाहेर काढले जाईल कि त्यांना दुय्यम नागरिकत्व दिले जाईल कि त्यांची संपत्ती जप्त होईल कि थेट लुटली जाईल याचीही कुणाला खात्री उरली नाहीये, अश्या अनिश्चित वातावरणात मार्केट अर्थव्यवस्था सुधारत नसते हे शेंबड्या पोरालाही कळत.

हा फक्त ब्रेन ड्रेन नाहीये, हा वेल्थ आणि हेल्थ ड्रेन आहे.

तुम्हाला आम्हाला नोकऱ्या देऊ शकणारे काही हजार उद्योगपती हा देश सोडून निघून गेले, आपले कारखाने बंद करून परदेशात गेले तर साहजिकच ठासली तुमची जाणार आहे, पाकिस्तानची नव्हे. रोजगार जाणारेत ते तुमचे, नाक्यावर पंक्चर काढणारा आहे तिथेच आहे, तुमच्या मात्र गाड्या पेट्रोल परवडत नसल्याने विकायची वेळ आलेली आहे.

त्यामुळे ज्यांनी २०१४ आणि २०१९ ला पाकिस्तानला आणि मुस्लिमांना धडा शिकवायला , मंदिर बांधायला , चीनला लाल डोळे दाखवायला मतदान केलेलं त्यांनी या आर्थिक अनागोंदी आणि खड्ड्यात जाणाऱ्या अर्थव्यवस्थेची काळजी करण्याच काहीही कारण नाहीये कारण या फुटकळ बाबी आहेत, रोजगार-शिक्षण-आरोग्य या बाबी ' ज्याने चोच दिली तो चारा देईलच ' या तत्वावर सगळ्यांना कमीअधिक फरकाने मिळतीलच नाही का ?

तेव्हा हे राष्ट्रवादाच्या, अस्मितांच्या पिपाण्या वाजवणारे लोक सोडून उर्वरित लोकांनी लक्षात घ्यावे, आता देश वाचवण्याची गरज आहे तरच आपण वाचू अन्यथा कपाळमोक्ष ठरलेला आहे. **(साभार)**

लोकसंसद

## रिल्सच्या स्टंटबाजांवर कठोर कारवाईची गरज

सध्या काळजात धडकी भरवणारा एक व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला आहे. ज्यामध्ये पुण्यातील एक तरुणी एका पडक्या इमारतीच्या वरच्या बाजूला लटकताना दिसत आहे. एका तरुणाने तिचा हात धरलेला आहे. दुसरा तरुण वेगवेगळ्या अँगलने त्याचे व्हिडिओ बनवताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातीलच बाईकवर धोकादायक स्टंट करणाऱ्या आणखी एका तरुणीचा व्हिडिओ समोर आला होता. व्हिडिओमध्ये ती तरुणी हात न वापरता गाणे गुणगुणत बाईक चालवताना (?) दिसत आहे. पुण्यातील या दोन्ही व्हिडिओंमधील घटनांमध्ये त्यांची किंचितशी चूक झाली तरी ती त्यांच्या जीवावरबेतली असती. त्यांच्या सुदैवाने जीवघेणी स्टंटबाजी करताना त्यांचे प्राण वाचले. तिसऱ्या व्हिडिओमधील तरुणी मात्र दुर्दैवी ठरली. त्या व्हिडिओनुसार छत्रपती संभाजीनगरच्या एका तरुणीला रिल बनवण्याच्या नादात कार दरीत कोसळल्यामुळे आपले प्राण गमवावे लागले. खरे तर सध्या असे चित्रविचित्र जीवघेणे रिल्स बनविण्याचे खुळ तरुणाईच्या डोक्यात गेले असून रिल्सचे वेड लागलेली तरुणाई रिल्स शूट करण्यासाठी जीवावर उदार झाली आहे. अशा तरुणाईला ताळ्यावर आणण्यासाठी त्यांच्यावर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

-प्रदीप शंकर मोरे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२४ जून**

**१९१४:-** वासुदेव गणेश टेंबे तथा टेंबेस्वामी (वासुदेवानंद सरस्वती) यांचे निधन. त्यांनी वेदोक्त धर्म तसेच दत्तोपासना या विषयांवर मराठीत लिखाण केले होते. १९३६:- लेखक, प्राचार्य वसुदेव नरहरी इंगळे यांचा जन्म. इंग्रजीतून लेखन करणाऱ्या प्राचार्य इंगळे यांचे 'अमृतकुंभ' हा लेखसंग्रह, 'पेरणी' हे काव्य आणि मामासाहेब जगदाळे यांचे चरित्र लिहिले आहे. १९३८:- प्रा. शं. ना. पाटील यांचा जन्म. यांच्या प्रकाशित पुस्तकात 'सुरात हरवलेली पाऊले या नाटकासह पाच एकांकिका, 'रुपाली','कादंबरी','सुजाता' कथासंग्रह तसेच ग्रामीण जीवनावर बेतलेला तीन संसार ह्या कथासंग्रहासह 'घुसमट' हे व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक प्रसिध्द आहे. याखेरीज वृपत्रे, दिवाळी अंकातून कथा, काव्य आणि आकाशवाणीवरुन ग्रंथ परीक्षणे त्यांनी केली. १९३९:- समीक्षक दिगंबर सखाराम पाध्ये यांचा जन्म. त्यांनी नारायण सुर्वे यांची कविता, साहित्य संस्कृती आणि समाजफया पुस्तकांसह 'समाज प्रबोधन पत्रिका','प्रतिष्ठान', 'महाराष्ट्र साहित्य पत्रिकाफआदी नियतकालिकांतून समीक्षणात्मक लेख परीक्षणे लिहिली. **१९४९:-** लेखक, पत्रकार समीक्षक विनय हर्डीकर यांचा जन्म. मराठीसह इंग्रजी वर्तमानपत्रातून लेखन. त्यांचे आणीबाणीच्या काळा संबंधीचे 'जनांचा हा प्रवाह चालला' हे पुस्तक गाजले. याशिवाय शहा आयोग : शोध आणि बोध','श्रध्दांजली' तसेच मर्ढेकरांच्या कवितेचे विश्लेषण करणारे पुस्तक त्यांनी लिहिली. **१९५४:-** लेखक, अनुवादक मधुकर धर्मापुरीकर यांचा जन्म. 'मालगुडी डेज्म,'स्वामी अँड फ्रेण्डस्म ही आर के नारायण यांची अनुवादित पुस्तके तसेच रेषा-लेखक वसंत सरवटे हे संपादन याशिवाय त्यांचे 'अप्रुप','रुप','विश्वनाथ' ह्या कथा तर 'चिनकुल्म ही लघुत्तम कथा, 'व्यंगचित्र : एक संवाद (पत्रव्यवहार)' आणि 'गीतमुद्रा व अंतः स्वर' हे ललित लेखन अशी साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. **१९७१:-** लेखक, समीक्षक आणि मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाचे पहिले प्रमुख माधव गोपाळ देशमुख यांचे निधन. 'मराठीचे साहित्यशास्त्र' हा प्रबंध पुस्तकरुप झालाच, शिवाय 'भावगंध', 'वाङ्मयीन व्यक्ती' आदी पुस्तके त्यांनी लिहिली. राज्यघटनेचे मराठी भाषांतर करण्याच्या समितीत ते होते. 'सीतास्वयंवर', 'कवी दत्तात्रेय घाटे उर्फ दत्तफ यांची समग्र कविता अशी महत्त्वाची संपादनेही त्यांनी केली. १९७४:- कवयित्री प्रा. साची राहूल भगत यांचा जन्म. 'भावनांचे प्रतिबिंब' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९७८:-** कवी नकुल शामराव इरपाते यांचा जन्म. 'लपंडाव' हा काव्यसंग्रह त्यांचा प्रसिध्द झाला आहे. **२०१२:-** संतसाहित्याचे अभ्यासक समीक्षक आणि पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी प्रमुख डॉ. मु. श्री. कानडे यांचे निधन. 'संतसाहित्य संदर्भकोश','संतांची ही भेटीफ,'संत नामदेव काव्य दर्शन','संत आणि शाहीर','नाट्य शोधा','कालचे नाटककार', 'मराठी रंगभूमीचा उषःकाल','दासबोध कोश' अशी विविध पुस्तके डॉ. कानडे यांनी लिहिली. विद्यापीठातून निवृा झाल्यावर त्यांनी पूर्णवेळ लेखनास वाहून घेतले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र साहित्य परिषदेने जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला होता.

**१८९२:** 'रविकिरण' मंडळाच्या संस्थापक सदस्य कवींपैकी एक कवी श्रीधर बाळकृष्ण रानडे यांचा जन्म २४ जून १८९२ रोजी नागपूर येथे झाला. रानडे कवी म्हणून प्रसिद्धीस आले ते त्यांच्या माधुकरी आणि लेझिम या कवितांमुळे महाराष्ट्र रसवंती, गद्यवैभव, नवयुग वाचनमाला या पुस्तकांचे त्यांनी संपादन केले.

अनेक स्फुटकाव्य रचणाऱ्या रानडे यांनी 'काळाच्या दाढेतून' सारखे खंडकाव्यही लिहिले. त्यांची पत्नीही कवियित्री होती. या दोघांच्या काव्याचा काव्यसंग्रह 'श्रीमनोरमा' या नावाने प्रसिद्ध झाला. यात त्यांच्या ७१ व पत्नीच्या ९२ कविता समाविष्ट आहेत. याशिवायही श्रीधर रानडे यांनी खानोलकरांच्या सहकार्याने 'महाराष्ट्र रसवंती' या अर्वाचीन कवितांच्या संग्रहाचे तसेच 'महाराष्ट्र गद्यवैभव' या ग्रंथाचे संपादन केले. याशिवाय आचार्य अत्र्यांच्या नवयुग वाचनमालेचेही ते काही काळ संपादक होते.

श्रीधर रानड्यांनी 'दिवाळीची डाली' हे प्रहसन, नव कुंपणावरुन' यासारखी छायानाट्य लिहून नाट्यक्षेत्रातही आपला ठसा उमटवला. याशिवाय आकाशवाणीवरुन मुलांसाठी होणाऱ्या 'गंमत-जंमत' या कार्यक्रमामधून तिंबूनाना बनून भाग घेतला. त्यांची ही व्यक्तीरेखा तेव्हा लोकप्रिय झाली. या कार्यक्रमासाठी त्यांनी लिहिलेल्या गोष्टी गाण्याचे पुस्तक 'तिंबूनानाच्या रेडिओ' या नावाने प्रसिद्ध झाले. याशिवाय काळाच्या दाढेतून ह्या खंडकाव्यातून कॉलराच्या आजारात मरणोन्मुख अवस्थेत असतानाचे चित्रण आहे.'महाराष्ट्र रसवंती, गद्यवैभव, नवयुग वाचनमाला या पुस्तकाचे संपादन त्यांनी केले. रविकिरण मंडळाच्या या महान कवीचे १९८४ साली निधन झाले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ जून
१) श्री. प्रभाकर रामराव गायकवाड
पोयनाड, अलिबाग, २४-६-१९५४
२) श्री.अनिल जॉन त्रिभुवन,
चेंढरे, अलिबाग, २४-६-१९५०
३) श्री. प्रमोद जनार्दन उकडे
नवेदर नवगाव, अलिबाग, २४-६-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखलअसलेल्यारुग्णांच्याएकानातेवाईकालाजेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

# पहिल्या पावसात माथेरानची दैना

## भूस्खलनात रस्ता खचला, घराचेही नुकसान, सुदैवाने जीवितहानी नाही

**। माथेरान । वार्ताहर ।**

उंच शिखरावरील रायगड जिल्ह्यातील माथेरानमध्ये पहिल्याच पावसात प्रशासनाचे पितळ उघडे पडले आहे. फक्त दोन तास जोरदार झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे पाण्याचा निचरा न होता रस्त्यावरून वाहत जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे भूस्खलन होऊन रस्ता खचला, यामध्ये एका घराचे नुकसान झाले असून, जीवितहानी झाली नसल्याचे वृत्त आहे.

माथेरान हे ७०० हेक्टरमध्ये घनदाट जंगलाने वेढलेलं शहर आहे. त्यामुळे सहाजिकच येथे जोरदार पाऊस पडतोच. मात्र, यावर्षी जून महिन्याच्या २० तारखेला दुपारी १२ वाजता अतिमुसळधार पाऊस विजांच्या कडकडाटासह बरसू लागला. दोन तास सुरू असलेल्या पावसाने पालिका प्रशासनाचे पितळ उघडे पडले आहे. दि.२० रोजी सकाळी ८.३० ते ५.३० या दरम्यान १५६ मिलिमीटर पाऊस बरसला.यापैकी फक्त दोन तासात १५० मिलिमीटर इतका पाऊस झाला.या पावसाच्या पाण्याचा प्रवाह इतका प्रचंड होता की येथील स्थानिकांना २६ जुलै २००५ ची आठवण झाली. पालिका प्रशासनाकडून पावसाळी गटारे काढणे,बांध टाकणे ही कामे हाती घेतली होती मात्र ती प्रत्यक्षात उतरली नसल्याने काही ठिकाणी गटाराचे पाणी रस्त्यावरून वाहत होते. पंचवटी नगरचा भाग उतारावर असल्याने बाजारपेठेतल्या महात्मा गांधी रस्त्याचा काही भाग, छत्रपती शिवाजी नगर, राजाराम साळुंके रोड येथील पाणी हे रस्त्यावरून पंचवटी नगरमध्ये घुसले. पंचवटी नगर हे उतारावर असल्याने पाण्याचा मोठा प्रवाह तिकडे जात होता, त्यामुळे पाण्याला जाण्यासाठी मार्ग नसल्याने पाण्याने रस्त्याच्या कठडा तोडून पाणी शेजारी असणाऱ्या घरात शिरले. रस्ता खचला आणि रस्त्याचे दगड घरावर पडले आणि घराचे नुकसान झाले, मात्र या घरात कोणीही राहात नसल्याने मोठी जीवितहानी टळली. तसेच इंदिरा गांधी नगर येथे गणेश मंदिर परिसरातील घरामध्ये रस्त्यावरील पाणी शिरले. दरवर्षी जून महिन्याच्या सुरुवातीला बांध घातले जातात, मग यावर्षी इतका उशीर का, असा सवाल केला जातोय.

> महात्मा गांधी रस्त्यावरील युनियन बँकेकडून पाणी वाहत छत्रपती शिवाजी महाराज नगर येथून राजाराम साळुंके रोड करत या तिन्ही भागातील पाणी पंचवटी नगरमध्ये घुसले. प्रचंड प्रवाहामुळे रस्त्याचा कठडा तोडून पाणी समोरच्या घरात घुसले. पाण्याबरोबर मोठे दगडही घरामध्ये घुसले व घराचे पार्टिशन तोडून पाणी बाहेर निघाले. हे सर्व दृश्य अगदी भयावह होते. दुपारी तीनच्या दरम्यान ही घटना घडली. पण, या पूर्ण दिवशी पालिकेचा एकही अधिकारी येथे भेट द्यायला आला नाही.
>
> – उमेश ढेबे, स्थानिक



### बांध घालणार कधी?

पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्यामध्ये बांध घातले जातात आणि ते पाणी गटारामध्ये सोडले जाते. याकामासाठी ठेकेदाराची नियुक्ती पालिकेकडून करण्यात आली आहे. दरवर्षी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बांध टाकण्याचे काम पूर्णत्वास जाते. मात्र, यावर्षी जून महिन्याचे तीन आठवडे उलटूनही बांध घातले नाहीत, त्यामुळे ठेकेदार नक्की काम करतो आहे की नाही यावर नगरपालिकेचा अंकुश राहिला नाही, त्यामुळे पालिका नक्की ठेकेदारासाठी आहे की सामान्य लोकांसाठी, असे नागरिकांमधून बोलले जात आहे. त्यामुळे पालिका ठेकेदारावर कारवाई करणार का, असा सवालदेखील स्थानिकांकडून विचारला जात आहे.

### नगरपालिका प्रशासन निष्क्रिय?

या पावसाच्या पाण्याच्या प्रवाहात लाखो रुपये खर्चून तयार केलेला रस्ता खचून भूस्खलन झाले. या रस्त्याकडे पालिकेने विशेष लक्ष देऊन वेळीच बांध घातले असते तर ही दुर्घटना टळली असती, पण याकडे एकही अधिकाऱ्याने आणि कर्मचाऱ्याने लक्ष दिले नसल्याने लाखो रुपयांचा रस्ता पाण्यात गेला. त्यामुळे पालिका प्रशासन निष्क्रिय झाले आहे का, असा सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

### आपत्ती व्यवस्थापन आहे कुठे?

पावसाळ्याच्या दिवसात कुठे ही अनुचित घटना घडू नये आणि झालीच तर त्याचे निवारण करण्यासाठी शासनाकडून आपत्ती व्यवस्थापनाची स्वतंत्र नियुक्ती केली जाते. या अनुषंगाने माथेरान नगरपालिकेने आपत्ती व्यवस्थापन कक्ष केला आहे. यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्तीदेखील केली आहे. मात्र, झालेल्या या दुर्घटनेच्या पाहणीसाठी एकही अधिकारी किंवा कर्मचारी आले नसल्याने स्थानिक रहिवाशांनी तीव्र नाराजी प्रकट केली असून, नगरपालिकेचे अधिकारी आणि काही कर्मचारी माथेरानमध्ये राहात नाहीत, त्यांनी या पावसाळ्यात येथेच राहावे, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

## डेक्कन जिमखाना येथे आरोग्य तपासणी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना येथे आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. आरोग्य आणि रक्तदान शिबिरात ४७ रुग्णांची तपासणी करण्यात आली, तर १५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांच्या आरोग्य पथकाच्या सहकार्याने डेक्कन जिमखाना मित्रमंडळ आणि गुरु गजानन प्रासादिक भजन मंडळ यांच्या माध्यमातून या शिबिराचे आयोजन केले होते.

डेक्कन जिमखाना येथील श्री गुरुदत्त मंदिरात आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.शिबिराचे उद्घाटन दिलीप आंबवणे, प्रसादबुवा पाटील, महेंद्र चंदन, माजी नगरसेवक मुकेश पाटील, मनसेचे तालुका अध्यक्ष महेंद्र निगुडकर, तसेच टिलराज विचारे, समीर चव्हाण, प्रशांत चंदन आदींच्या उपस्थितीत झाले. या शिबिरात रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे डॉ. विद्या कान्हेरे, डॉ. अभिषेक काळे, डॉ. सोनाली चव्हाण यांनी रुग्णांची तपासणी केली. आरोग्य शिबीर यशस्वी व्हावे यासाठी सुनील देशमुख, सुनील आंबवणे, कौशिक वांजळे, रवींद्र लाड यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचे हातभार लागले.

## शेतकऱ्यांनी धरली आधुनिकतेची कास

**। रसायनी । वार्ताहर ।**



खालापूर तालुक्यातील काही भागात पावसाने दमदार हजेरी लावली असून, वेळेवर पाऊस आल्याने शेतकरी आनंदीत झाला आहे. शेतीच्या नांगरणीला सुरूवात झाली आहे. शेतकऱ्यांचा पारंपरिक मित्र असलेल्या बैलांची जागा आत्ता ट्रॅक्टरने घेतली आहे. त्यामुळे शेतकरी ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी करताना दिसत आहेत.

या परिसरातील जवळपास सर्वच जमिनी धनिकांच्या आहेत. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकल्या आहेत, परंतु जे हाडाचे शेतकरी आहेत, त्यांनी आपल्या जमिनीत मोती उगविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. त्याला आधुनिक यंत्रांची जोड देण्यात येत आहे. अनेक शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचत नाहीत. नांगरणीसाठी बैल नाहीत. कारण बैल पाळणे बऱ्याच जणांना विविध कारणांमुळे परवडत नाही. मनुष्यबळ असूनदेखील कुणीही मेहनतीने काम करण्याची तयारी दाखवत नाही. कमी श्रमात काम करून पैसे मिळविण्यासाठी प्रत्येकजण धावत असल्याने पारंपरिक शेती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. पण, काही शेतकरी नेटाने शेती करत आहेत. बैल जुंपून शेती नांगरण्यासाठी अनेक दिवस जातात. त्यामुळे खूप मेहनत घ्यावी लागते. ट्रॅक्टरने काही तासात नांगरणी होते. त्यामुळे बैल पाळण्याकडे लोकांचा कल कमी झाला आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबरोबर पूर्वीसारखी एकत्रित शेती केल्यास मजूर, पैसा याची बचत होईल.

## तुकाराम मालकर यांचे निधन

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील तळवली गावात राहणारे तुकाराम दामू मालकर यांचे राहत्या घरी दि. १२ जून रोजी अल्पशा अजाराने निधन झाले. निधनसमयी ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या अंत्यविधीस सामाजिक, राजकीय आशा विविध स्तरातील मान्यवर त्यांच्या अंत्य दर्शन घेण्यासाठी



उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मुलगा संतोष, देविदास, प्रल्हाद, धृव, भाऊ- जयराम, मधुकर, बहिणी, सुना, नातवंडे, पंतवंडे, जावई असा मोठा परिवार आहे.

## कोल्हारेतील नाल्याने घेतला मोकळा श्वास

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील कोल्हारे गावातील नैसर्गिक पाणी वाहून नेणारा नाला शेतकऱ्याने बंद करून ठेवला होता. मात्र, जोरदार पाऊस झाल्याने नाला बंद केल्याने परिसरातील सर्व शेतीमध्ये पाणीच पाणी साचले आणि स्थानिकांच्या घरात पाणी जाण्याची शक्यता निर्माण झाली होती.

कोल्हारे गावातील स्थानिक शेतकऱ्यांच्या रस्त्याचा प्रश्न असल्याने त्यांनी नाल्याचा भाग आपल्या शेतीत असल्याने बंद करून ठेवला होता. गेली दोन महिने तो नाला बंद करून ठेवला होता, त्या काळात संबंधित यंत्रणा यांच्याकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे नाला बंद करण्याचा विषय तसाच होता. मात्र, पावसाळा सुरु झाल्याने शेतकऱ्यांनी बंद केलेल्या नाल्यातून नैसर्गिक पाणी वाहून नेण्याची वाट बंद झाली आणि त्यामुळे पाणी आजूबाजूच्या शेतात घुसले. काही पाणी ग्रामस्थांच्या पायरीपर्यंत पोहोचल्याने महसूल विभागाला त्याबाबत तक्रारी ग्रामस्थांनी केल्या आहेत. त्यावर नेरळ येथील मंडळ अधिकारी संतोष जांभळे हे घटनास्थळी पोहोचले. तेथील परिस्थिती पाहून नाला पुन्हा खुला करण्यासाठी जेसीबी मशीन मागवून घेण्यात आल्या आणि त्यानंतर नाला खुला करून नैसर्गिक पाण्याला वाट करून दिली. नेरळ मंडळ अधिकारी संतोष जांभळे व कोल्हारे तलाठी उमेशकुमार भोरे यांनी तात्काळ दखल घेत तेथील परिस्थितीचा आढावा घेऊन नाला मोकळा करून दिला.

## मराठा बांधव, विद्यार्थ्यांना तातडीने दाखले द्यावे

**। धाटाव । वार्ताहर ।**



सरकारी दप्तरात नोंदी तपासून समाज बांधवांना तातडीने दाखले देणे, आजगायत कुणबी मराठा किती नोंद सापडल्या किती दाखल्यांचे वाटप करण्यात आले, प्रक्रियेत अडथळे काय? याबाबत महत्त्वाची चर्चा करण्यासाठी सकल मराठा समाजाचे अध्यक्ष आप्पा देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने शुक्रवारी तहसीलदार किशोर देशमुख यांची भेट घेतली.

मुख्यतः तालुक्यातील सर्वच विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या दाखल्यांना विलंब होत आहे. दाखल्यांसाठी विद्यार्थी त्यांचे पालक दररोज पायपीट करत आहेत. मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दाखले वेळेत मिळत नाहीत अशा प्रचंड तक्रारी समोर आल्यात, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या दाखल्यांसाठी नेमकी अडवणूक कुठे होते? याही महत्त्वाच्या विषयांवर तहसीलदार देशमुख यांच्याशी चर्चा केली. चर्चेअंती तहसीलदार किशोर देशमुख यांनी शालेय विविध दाखले देण्याची प्रक्रिया सुरळीत जलद सुरू आहे. उर्वरीत प्रलंबित दाखले तात्काळ दिले जातील, असे ठोस आश्वासन तहसीलदार किशोर देशमुख यांनी समाज शिष्टमंडळाला दिले.

यावेळी अध्यक्ष अप्पा देशमुख, उपाध्यक्ष नितीन परब, संदीप सावंत, निलेश शिर्के, राजेंद्र जाधव, प्रशांत देशमुख, राजेश काफरे उपस्थित होते.

## उद्वाहन कार्यान्वित होणार, सरकत्या जिन्याचे काय?

### प्रवासी संघटनेचा रेल्वे प्रशासनाला प्रश्न

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील कर्जत एन्डकडील भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी अनेक विकासकामे सुरु आहेत. त्यात कर्जत दिशेकडे उद्वाहन उभारण्याचे काम सुरु आहे. मात्र, या स्थानकातील सरकत्या जिन्याचे काम अद्याप सुरूच झाले नाही, अशी तक्रार भिवपुरी रोड प्रवासी संघटनेने केली आहे.

मेन लाईनवरील कर्जत दिशेला असलेल्या भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी उदवाहन उभारण्याचे काम सुरु आहे. गेली अनेक महिने त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे काम सुरु नव्हते. त्यामुळे कर्जत येथील माहिती अधिकार कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी पुढाकार घेतल्याने आता भिवपुरी रेल्वे स्थानकात रखडलेल्या उद्वाहन उभारणी कामाला गती मिळाली आहे. तर, आता पुढील महिन्यात उद्वाहन यंत्रणा कार्यान्वित होईल, असा विश्वास रेल्वे प्रशासन यांच्याकडून देण्यात आले आहे. त्यामुळे भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेने समाधान व्यक्त केले आहे. मात्र, त्याचवेळी भिवपुरी रोड स्थानकात फलाट दोनच्या बाहेर डिकसळ गावाच्या बाजूला सरकता जिना उभारण्यात येणार आहे. या सरकत्या जिन्याचे कोणतेही काम अद्याप सुरु करण्यात आले नाही. त्यामुळे भिवपुरी रोड स्थानकातील



सरकत्या जिन्याचे काम कधी सुरु होणार, असा प्रश्न भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष किशोर गायकवाड, पदाधिकारी महेश कडव, राजेश विरले यांनी उपस्थित केला आहे.

## काजुवाडीत संरक्षक भिंतीचे नुकसान

### समाजकंटांविरोधात रोहा पोलिसात गुन्हा

**। नागोठणे । वार्ताहर ।**



रोहा तालुक्यात जमिनींचे भाव गगनाला भिडलेले असतानाच अतिक्रमण व दादागिरी करुन जागा हडप करणाऱ्यांची वक्रदृष्टी मोक्याच्या ठिकाणच्या जमिनींवर पडली आहे. यातीलच एक ताजी घटना म्हणजे, रोहा तालुक्यातील व रोह्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या खारी येथील काजूवाडी गावातील असलेल्या व सैन्य दलातून देशाची सेवा बजाविणाऱ्या सैनिक जागा मालकाने आपल्या जागेत घातलेले वॉल कंपाऊंड तोडून नुकसान करण्याचा प्रयत्न केला. पांढऱ्या रंगाच्या ईको कारमधून आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींकडून शुक्रवारी (दि.२१) हे कृत्य करण्यात आले. त्यामुळे काजूवाडी येथील जागा मालक संतोष हरिश्चंद्र खिरीट यांच्या तक्रारीनुसार अज्ञातांविरोधात रोहा पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपलब्ध माहितीनुसार, भारतीय सैन्य दलात सेवा बजावत असलेले काजूवाडी (ता. रोहा) येथील संतोष हरिश्चंद्र खिरीट यांनी काजूवाडी गावातच १० गुंठे बिनशेती जागा काही महिन्यांपूर्वी संबंधित जागा मालकाकडून खरेदी केली होती. संतोष खिरीट हे देशाच्या सैन्य दलात असल्याने ते सुट्टी मिळाल्यानंतरच अल्प कालावधीसाठी गावी येत असतात. अशाचप्रकारे काही दिवसांपूर्वी संतोष खिरीट सुट्टीवर आल्याने त्यांनी आपल्या जागेत वॉल कंपाऊंड जोता बांधकाम सुरु केले. सदरच्या वॉल कंपाऊंडचे बांधकाम जवळजवळ पूर्णत्वास आलेले असतानाच शुक्रवारी (दि.२१) दुपारी १ ते २.३० वा.च्या. सुमारास संबंधित जागेवर येऊन तोडून नुकसान केले आहे. अशा गुंडगिरी करणाऱ्यांचा रोहा पोलिसांनी शोध घेऊन त्यांच्या विरोधात सक्त कारवाई करण्याची मागणी भारतीय सैन्य दलातील संतोष खिरीट यांनी केली आहे.

## कडापे प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



उरण तालुक्यातील आवरे येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालयाचे उपशिक्षक निवास गावंड आणि सामाजिक कार्यकर्ते शंकर पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, कडापे येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड, पट्टी, त्याचबरोबर शालेय पोषण आहारासाठी लागणाऱ्या डिशचे वाटप करण्यात आले.

वाढदिवसावर नाहक खर्च करण्यापेक्षा शालेय गरीब गरजू विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या शैक्षणिक साहित्याचे वाटप केल्यास विद्यार्थ्यांना शाळेची व अभ्यासाची गोडी लागते. चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आम्हाला आमच्या वाढदिवसापेक्षा मोठा असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक हितेंद्र म्हात्रे यांनी केले. यावेळी ज्ञानेश्वर गावंड, निवास गावंड, शंकर पाटील, विनायक गावंड, संतोष म्हात्रे, वत्सला म्हात्रे तसेच अन्य मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांनी मारल्या शेतीविषयी गप्पा

### शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यात सुसंवाद

**। तळा । वार्ताहर ।**

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत किसान गप्पा गोष्टी कार्यक्रमाचे आयोजन प्रशासकीय भवन तळा येथील सभागृहामध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रकल्प संचालक आत्मा तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, प्रकल्प उपसंचालक आत्मा शिवाजी भांडवलकर उपविभाग कृषी अधिकारी माणगाव रविशंकर कावळे, तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे, तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. राजेश मांजरेकर व जीवन आरेकर विषय विशेषज्ञ कृषी विज्ञान केंद्र रोहा, मंडळ कृषी अधिकारी सारिका सावंत, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक सचिन लोखंडे व सर्व क्षेत्रीय कर्मचारी, तसेच तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थितांचे आभार मानण्यात आले. त्यानंतर आनंद कांबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी कृषी विभाग तळा तालुक्यात राबवित असलेल्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. यानंतर उपस्थित शास्त्रज्ञांनी आंबा पुनरुज्जीवन, आंबा पिकात मिरी लागवड, आंबा घन लागवड, खुंटी कलम, आंबा पीक किड रोग व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले व शेतकऱ्यांच्या समस्यांविषयी चर्चा केली. तसेच आंबा पिकातील शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे समाधान केले. अध्यक्षीय भाषणामध्ये जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी वंदना शिंदे यांनी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## रायगड टायलेंट रीसर्चची स्थापना

# विद्यार्थ्यांचा विकास साधणार : रत्नाकर पाटील

**। तळा । वार्ताहर ।**




रायगड जिल्ह्यातील परिषदेच्या होतकरू शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी रायगड टायलेंट रीसर्चची स्थापना करण्यात आली आहे. याठिकाणी पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असून, विद्यार्थांमधील बौद्धिक क्षमतेचा असलेला विकास पाहून किंवा त्या विद्यार्थ्यांचा विकास होऊ शकतो. भविष्यात आपले करिअर घडू शकेल या उदात्त हेतूने या संस्थेची स्थापना उच्च विद्याविभूषित रत्नाकर तु. पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून करण्यात आली.

संपूर्ण रायगडमधील विद्यार्थी घडला पाहिजे, त्याला पूर्ण शिक्षण घेता यावे, हा या सहकारी शिक्षक वर्गाचा सहभाग हेतू आहे. अल्प शिक्षणावर न थांबता उद्दिष्ट समोर ठेवले तर शक्य होऊ शकते, असे रत्नाकर पाटील यांनी याप्रसंगी सांगितले.

या संस्थेची सर्वसाधारण सभा नागोठणे येथे नुकतीच झाली. यावेळी कार्यकारिणीची निवड व जिल्हा मुख्य समिती निवड करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्ष अमिष महादेव भौड (तळा), उपाध्यक्ष मानसी मिलिंद भोसले (पनवेल), उपाध्यक्ष मुकेश रमेश भोस्तेकर (माणगाव), सचिव संजय मुरलीधर पाटील (पनवेल), सहसचिव उमेश सीताराम ठाकूर (अलिबाग), खजिनदार जनार्दन नाना भिलारे (सुधागड), सहखजिनदार अनिल राणे (सुधागड), सदस्य रत्नाकर तुकाराम पाटील (पोलादपूर), विवेकानंद भवानजी पोटे (रोहा), राकेश दादाजी अहिरे (पेण), दिलदार बाळाराम थळे (अलिबाग), मित्तल सुहास वावेकर (तळा), निलेश तुकाराम गारगोटे (खालापूर) यांचा समावेश आहे.

निवडक

## कोकण विभागपदी पाटील

**पनवेल :** प्रादेशिक परिवहन अधिकारी कोकण विभागपदी जयंत पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. तत्पूर्वी, कळंबोली येथील कार्यालयात अनिल पाटील हे परिवहन अधिकारी म्हणून कार्यरत होते. परंतु, त्यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी ठाणे येथे कार्यरत असणारे जयंत पाटील यांना बढती मिळून त्यांची या ठिकाणी बदली झाली असून, त्यांच्या अखत्यारीत सिंधुदूर्ग, रत्नागिरी, पेण, पनवेल या कोकण विभाग असणार आहे.

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल शहर परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या इसमाचे अंदाजे वय ६५ ते ७० वर्षे, रंग सावळा, उंची ५ फूट, चेहरा उभट, अंगाने सडपातळ असून, डोक्याचे व दाढीचे केस काळे पांढरे व वाढलले आहेत. त्याच्या अंगात निळ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पँट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र.०२२-२७४५२३३३ संपर्क साधावा.

## विद्यार्थ्यांना शालेय वस्तू भेट

**पनवेल :** दिशा व्यासपीठाच्या वतीने आदिवासी पाड्यांवर शालेय विद्यार्थ्यांना विविध वस्तूंचे वाटप करण्यात आले. कर्जतजवळ पिंपळपाडा येथील पहिली ते पाचवीपर्यंतच्या २३ मुला-मुलींना धीरज स्नेह उपाहारच्या इंदू झा व अमित पाटील यांच्या विशेष सहकार्याने प्रशाळेची बॅग व छत्रीचे वाटप करण्यात आले, तसेच मुलांना खाऊ ही देण्यात आला. सामाजिक भान जपणार्या इंदू झा यांनी मुलांना शुभेच्छा देत शिक्षणासाठी कुणाला अडचण येत असेल तर मदतीस तत्पर असेन, असे आश्वासनही दिले.

## ‘सरगम’मध्ये सहभागी व्हा!

**पनवेल :** लायन क्लब ऑफ पनवेल सरगम गेल्या वर्षभरात पनवेल परिसरात सातत्याने समाजकार्य करत आहे. लायन क्लबचा इतिहास आंतरराष्ट्रीय पातळीवर असून त्याचं नाव खूप मोठं आहे. लायन्स क्लबमध्ये २० वर्षांपासून पुढे वयोवृध्दांपर्यंत कोणीही सामील होऊ शकत. ज्यांना सामाजिक कार्याची आवड आहे, ज्यांना या ग्रुपमध्ये सहभागी व्हायचे आहे, त्यांनी ७७००९७६३५२, ९८६९३४७३००, ९८१९६५४४१९, ९९३०००२९३२, ९८२०९७४७१५ येथे संपर्क साधावा.

## ‘कराओके’चे व्यासपीठ

**पनवेल :** हौशी कलाकारांसाठी पनवेलमधील इव्हेंट कंपनी ॲडव्हेंचर एंटरटेन्टमेंटने एक अनोखा उपक्रम सुरु केला आहे. ज्यांना गायनाची आवड आहे अशा कलाकारांसाठी एक व्यासपीठ उपलबध करुन दिले आहे. पनवेल, उरण, ठाणे, पुणे, उलवे, ऐरोली, लोधिवली, पेण, रसायनी, तळोजा या ठिकाणांहून कलाकार या कार्यक्रमासाठी हजेरी लावत आहेत. कलाकारांमध्ये स्टेज डेअरींग यावे व कलाकार पुढे जावा ही यामागची भावना असल्याचे कंपनीचे संचालक मंगेश देशपांडे यांनी सांगितले.

# तलावाच्या भिंतीला मोठे भगदाड

## ■ नेरळकरांकडून सुशोभिकरांचा दर्जा पाहून संताप व्यक्त

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**नेरळ ग्रामपंचायतीमध्ये अमृत सरोवर अभियानांतर्गत सरोवर सुशोभिकरणाचे काम केले जात आहे. राजमाता जिजामाता तलावामध्ये या अभियानांतर्गत बांधकाम सुरू आहे. मात्र, मागील महिन्याभरात बांधकाम करण्यात आलेल्या तलावाची भिंत पहिल्याच पावसात कोसळली आहे. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायत कार्यालयासमोर तब्बल दोन कोटी खर्चून बनवण्यात येत असलेल्या तलाव सुशोभिकरण कामाचा दर्जा पाहून नेरळकर संतप्त झाले आहेत.**



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून अमृतसरोवर अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानामधून नेरळ ग्रामपंचायतीमधील राजमाता जिजामाता तलाव येथे अमृत सरोवर सुशोभिकरण करण्याचे काम केले जात आहे. तब्बल दोन कोटी रुपयांच्या खर्चातून राजमाता जिजामाता तलाव येथे संरक्षण भिंत, तलाव खोलीकरण आदी कामे मंजूर होती. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाने नोव्हेंबर २०२१ मध्ये कामाला मंजुरी दिली होती. त्यानंतर त्या कामाची मुदत वर्षभराची होती आणि नेरळ येथे ग्रामपंचायतचे तलावात लावलेल्या फलकावर निर्देशित केले आहे. मात्र, आज २०२४ सुरू असून, त्याप्रमाणे अमृत सरोवर अभियानामधून सुरू असलेले काम हे दोन वर्षांपूर्वीचे मंजूर काम आहे. मग ते बांधकाम तब्बल दोन वर्षे नंतर का सुरू होत आहे आणि त्यासाठी जिल्हा जल संधारणा विभागाने कशी मंजुरी दिली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मात्र नेरळ ग्रामपंचायत मध्ये तब्बल दोन कोटींचा खर्च करून बांधण्यात येत असलेल्या राजमाता जिजामाता तलावात उभारण्यात आलेली भिंत पहिल्याच पावसात कोसळली आहे. त्यामुळे दोन वर्षे उशिरा बांधकाम केले जात असताना मागील दीड महिन्यात करण्यात आलेले बांधकाम पाहिल्यावर निकृष्ट कामाचा नमुना या ठिकाणी दिसून येत आहे, असा आरोप नेरळकर करीत आहेत. त्यामुळे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या प्रत्येक ग्रामस्थांच्या मनात बांधकामाच्या दर्जाची चर्चा सुरू असून, चौकशी करण्याची मागणी होत आहे.

> **काल आम्ही कर्जतमध्ये नव्हतो आणि त्यामुळे पावसाचा अंदाज आला नाही. मात्र, नेरळ येथे अमृत सरोवरमधून सुरू असलेल्या तलावातील बांधकाम कोसळले असल्याची माहिती ठेकेदाराने दिली नाही. मात्र, आम्हाला माहिती मिळाली असून, आम्ही त्या ठिकाणी जाऊन पाहणी करणार आहोत.**
> **– निलेश खिल्लारे, उपअभियंता, राजिप**

## महाविकास आघाडीच्या उमेदवाराला पदवीधरांचा वाढता प्रतिसाद

**। पनवेल । वार्ताहर ।**

कोकण पदवीधर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कीर यांच्या प्रचारात बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेज तळोजा फेज २ या ठिकाणी उत्स्फूर्त सभा पार पडली.

या सभेला जवळपास २०० हून अधिक पदवीधर व शिक्षक मतदार उपस्थित होते. पदवीधरांना रोजगारची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार निकराने काम करतील आणि हे कार्य करण्यासाठी आम्ही कार्यकर्ते मंडळी त्यांच्याकडे पाठपुरावा करू, अशी ग्वाही शिवसेना संपर्कप्रमुख व उरण पनवेल महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबन पाटील यांनी मतदारांना दिली.

शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी देखील बैठकीला मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. बबनदादा पाटील, काँग्रेसचे आर. सी. घरत, जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील काँग्रेस, समाजवादी पार्टीचे अनिल नाईक, शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस देवेंद्र मढवी, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, महानगरप्रमुख एकनाथ म्हात्रे, तालुकाप्रमुख विश्वास पेटकर, काँग्रेसचे बबन केणी, शेतकरी कामगार पक्षाचे प्रसाद ढगे पाटील, शिवसेनेचे कैलास पाटील, बाळा मुंबईकर, गणेश म्हात्रे, मुरलीधर म्हात्रे, काँग्रेसचे नोफील सय्यद सय्यद, शेकापचे संदीप केणी, वामन घरत, संदीप प्रताप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कीर यांना बहुमतांनी निवडून द्यावे, असे आवाहन पदवीधर मतदारांना केले. विधिमंडळात आपले प्रश्न मांडून त्यांची सोडवणूक करणारा उमेदवार हवा असल्याने रमेश कीर यांना निवडून द्यावे, असेही यावेळी उपस्थितांना सांगण्यात आले.

# दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार



**। मुरूड । वार्ताहर ।**

हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्या मंदीर विद्यालयाच्या मार्च २०२४ च्या एसएससीचा सेमी इंग्रजीचा निकाल १०० टक्के लागला असून, उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी हिंदू एज्युकेशन सोसायटीचे विश्‍वस्त मनोहर गुरव, मृदुला आबदेव, दीपाली जोशी, मनिषा फाटक, सचिव सुनील विरकुड, मुख्याध्यापिका प्रविता गार्डी पालक व शिक्षक उपस्थित होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक रुद्राणी हेरंब जोशी ७८.८० टक्के, द्वितीय क्रमांक सार्थक संदीप ठाकूर ७७.६० टक्के, तृतीय क्रमांक आर्या सुनील बनिया ७०.४० यांचा समावेश आहे.

यावेळी दीपाली जोशी, मनोहर गुरव, मनिषा फाटक मुख्याध्यापिका प्रविता गार्डी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उच्च शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी या शाळेत बालवाडीपासून दहावीपर्यंत ज्या शिक्षकांनी संस्काराची शिदोरी देऊन आम्हाला घडविले त्यांना व शाळेला कधीच विसरता येणार नाही अशा शब्दात संवेदना व्यक्त केल्या.

हिंदु एज्युकेशन सोसायटी व भोसला मिलटरी स्कूल नासिक यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या शैक्षणिक वर्षापासून इ.११ वी विज्ञान (आयटीसह) शाखेचे वर्ग सुरु करणार असल्याची माहिती दीपाली जोशी यांनी दिली.

## मुसळधार पावसामुळे तुंबले पाणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

गेल्या काही तासापासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे कळंबोली वसाहतीसह इतर अनेक ठिकाणी पाणी तुंबल्याचे प्रकार घडले आहेत. यामुळे वाहतूक कोंडीसुद्धा झाली आहे. पावसाने आता जोर पकडण्यास सुरूवात केली असून, पहाटेपासून पनवेल परिसरात चांगलाच मुसळधार पाऊस पडत आहे. या पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले आहे. त्यातच कळंबोली वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू असल्याने पाणी मोठ्या प्रमाणात साचले आहे. यातून मार्ग काढताना वाहन चालकांसह आबालवृद्धांना त्रास होत आहे. तर, काहींनी या पडणाऱ्या पावसात भिजण्याचा आनंदसुद्धा लुटला आहे.

# कामोठे सब स्टेशनसाठी शेकापचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**। पनवेल । वार्ताहर ।**

कामोठे नोडमध्ये विजेच्या मागणीत वाढ झाली आहे. नोडमधील एकमेव उपकेंद्रावर भार वाढला आहे. त्यामुळे शटडाऊनसारख्या घटनेत वाढ झाली आहे. शेकाप कामोठे शहराध्यक्ष अमोल शितोळे यांनी अतिरिक्त उपकेंद्र सुरू करण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कामोठे नोड अंतर्गत कामोठे, जुई, नौपाडा येथे झपाट्याने शहरीकरण झाले आहे. लोकसंख्या तीन लाखांच्या घरात पोहोचली आहे. या नोडमध्ये सुमारे ६० हजार वीज ग्राहक आहेत. खारघर येथून ४०० केव्ही ट्रान्समिशन सबस्टेशनवरून ३३ केव्हीच्या दोन फिडरवरून ओव्हरहेड लाईनमार्फत कामोठ्यातील सेक्टर ९ मधील सबस्टेशनला वीजपुरवठा होतो.

उन्हाळ्याच्या दिवसात उकड्यामुळे विजेच्या मागणीत प्रचंड वाढ होते. त्यामुळे सेक्टर ९ मधील सबस्टेशनवर अतिरिक्त भार येत असल्याने तांत्रिक बिघाड, देखभाल दुरुस्तीसाठी शटडाऊन यासारख्या घटनेत वाढ झाली आहे. याव्यतिरिक्त खारघर येथून येणाऱ्या ओव्हरहेड लाईनवर कावळ्यामुळे तांत्रिक बिघाडाच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असून, महावितरणाच्या डोकेदुखीत भर पडत चालली आहे.

महावितरणाने कामोठे सेक्टर २५ मध्ये सब स्टेशन उभारण्यासाठी सिडकोकडे निःशुल्क जागा मागितली आहे. सिडकोने निःशुल्क जागा देण्यास विरोध केला आहे. त्यामुळे सब स्टेशनचे घोंगडे भिजत पडले आहे. शेकाप कामोठे शहराध्यक्ष अमोल शितोळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याप्रकरणी लक्ष देण्याची मागणी केली आहे.

ठाणा नाका परिसरात पनवेल टिंबर मार्ट या ठिकाणी ट्रान्समिशनच्या नवीन सब स्टेशनचे काम सुरू आहे. या ठिकाणाहून खांदेश्‍वर व मानसरोवर येथे सुरू असलेल्या पंतप्रधान आवास योजनेला वीजपुरवठा करण्यात येणार आहे. या सब स्टेशनवरुन कामोठे नोडला वीजपुरवठा केला जाणार असल्याची माहिती महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

> **कामोठे नोडमध्ये सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. वीज ग्राहक नियमित बिल भरतो. वीज ग्राहकाला सुरळीत वीजपुरवठा करण्याची महावितरणाची जबाबदारी आहे. सेक्टर ९ मधील सबस्टेशन वीजपुरवठा करण्यासाठी सक्षम नसल्याने अतिरिक्त सब स्टेशन सुरू करण्याची गरज आहे.**
> **– अमोल शितोळे, अध्यक्ष, शेकाप कामोठे शहर**

# भंगार गोदामाला भीषण आग



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील तळोजा परिसरातील रोहिंजण या ठिकाणी असलेल्या भंगार गोदामाला अचाकनपणे लागलेल्या आगीत येथील मालाचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

रोहिंजण टोल नाक्याजवळ असलेल्या भंगार गोदामाला शुक्रवारी सकाळी अचानकपणे आग लागली. आगीचे वृत्त समजताच तळोजा पोलिसांचे पथक त्याचप्रमाणे तळोजा व परिसरातील अग्नीशमन दलाचे पाच बंब घटनास्थळी पोहोचले व त्यांनी आग विझविण्यासाठी अटोकाट प्रयत्न केले. या आगीत मोठे नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु, या ठिकाणी अशा प्रकारच्या आग नेहमीच लागत असल्याने त्या भागात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे. तरी शासनाने या ठिकाणी लक्ष घालून येथील भंगार गोदामे हलविण्याची मागणी या परिसरातील नागरिक करीत आहेत.

## अज्ञातांनी ट्रक चालकाला लुटले

**पनवेल :** तालुक्यातील मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील पळस्पे हायवे ट्रॅफिक चौकीजवळ शुक्रवारी पहाटे उभ्या ट्रक चालकाला चार अज्ञात इसमांनी मारहाण करून लुटल्याची घटना घडली आहे. उदयविर बरनामसिंग श्रीवास्तव (३६) व त्याचा सहकारी हे त्यांच्या ताब्यातील वाहन क्र.एचआर-३८-एबी-६२२४ हे वाहन थांबवून टायरमधील हवा तपासत असताना अचानक चार अनोळखी इसम त्या ठिकाणी आले व त्यांनी या दोघांना हाताबुक्क्यांनी तसेच एका इसमाने त्याच्या सहकाऱ्यास लोखंडी रॉडने डोक्यात मारहाण करून जखमी केले. दरम्यान, त्यांच्याकडील रोख रक्कम तसेच मोबाईल फोन असा ऐवज लंपास केला.

# महाड येथील गोहत्येचा निषेध



## ■ तहसीलदारांना निवेदन सादर

**। तळा । वार्ताहर ।**

महाड येथील इसाने कांबळे येथे करण्यात आलेल्या गोहत्येच्या निषेधार्थ तळा तालुका सकल हिंदू समाजातर्फे तळा तहसीलदार स्वाती पाटील यांना निवेदन देण्यात आले. महाड तालुक्यातील इसाने कांबळे येथे मंगळवार, दि. १८ जून रोजी बकरी ईदच्या पार्श्‍वभूमीवर बेकायदा गोहत्या करण्यात आली होती, तसेच गोहत्या करणाऱ्या कसाई व त्याच्या अन्य साथीदारांनी गोरक्षक व पोलिसांवरदेखील हल्ला केला होता. याचा निषेध म्हणून तळा तालुक्यातील सकल हिंदू समाजातर्फे तळा तहसीलदार स्वाती पाटील यांना निवेदन देण्यात आले असून, या प्रकरणातील दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याप्रसंगी तालुक्यातील सकल हिंदू समाज बांधव उपस्थित होते.

# ‘महाराज’ चित्रपटाचे प्रदर्शन थांबावा; श्री गुरुसेवा समिती ट्रस्टने केली मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

यशराज फिल्म्स निर्मित महाराज या चित्रपटाच्या आगामी रिलीज करू नये यासंदर्भात पनवेल शहरातील श्री गुरुसेवा समिती ट्रस्टने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे निषेध मोर्चा काढून मागणीचे निवेदन दिले आहे.




या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, चित्रपटातील घटनांचे चित्रण १८६२ च्या वादग्रस्त महाराज लिबेल केसवर आधारित असू शकते, ज्यात पुष्टी मार्गीय वैष्णव समुदाय आणि सर्वसाधारणपणे सनातन हिंदूंच्या भावना खोलवर दुखावण्याची क्षमता आहे. महाराज बदनामी प्रकरण हा एक अत्यंत संवेदनशील मुद्दा होता, ज्यामुळे १९ व्या शतकात सामाजिक अशांतता निर्माण झाली होती. या प्रकरणावर आधारित कोणताही चित्रपट, जर अत्यंत संवेदनशीलतेने आणि अचूकतेने हाताळला गेला नाही, जुने वाद पुन्हा पेटू शकतात आणि मोठ्या समुदायाच्या धार्मिक श्रद्धा दुखावू शकतात, वैष्णव व सनातन हिंदूंनी खालील बाबी विचारात घेण्याची विनंती केली आहे. ऐतिहासिक तथ्ये चुकीच्या पद्धतीने मांडण्याची आणि व्यक्तींचे नकारात्मक चित्रण तयार करण्याची या चित्रपटाची क्षमता आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. वेटर, २. नाश्ता बनवणारा कूक, ३. हाऊस कीपिंग, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- ५०००० रुपये किंमतीचा CNC मशिन ऑपरेटींगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत, पात्रता १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा-३० वर्षे पर्यंत. पगार- १०००० रुपये, ८ तास ड्युटी, संपर्क- ९०४९६५५५२३
- उत्तर भारतीय शाकाहारी स्वयंपाकी (वय ३५ ते ४५)- कर्जत लहान कुटुंब संपर्क करा- ९८२१२२५५५८ सकाळी ८ ते दुपारी १२ दुपारी ४ ते रात्री ८ दरम्यान
- Vacancies for office staff for Office in Alibag Fresh graduates required For interview Call 9422383099 Between 11.am to 6 pm

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पालिका हद्दीतील समस्या दूर करा

## शरद पवार गटाचे आयुक्तांना निवेदन

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**



पालिकेच्या आयुक्तपदी नव्याने नियुक्ती करण्यात आलेले आयुक्त मंगेश चितळे यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाध्यक्ष सतीश पाटील यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी भेट घेतली. चितळे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा तर देण्यात आल्याच. त्याचबरोबर त्यांच्यासमोर या भागातील समस्यांची तुतारी वाजवण्यात आली. यासंदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी पाटील आणि त्यांच्या शिष्टमंडळाने केली.

पनवेल महानगरपालिकेची स्थापना होऊन जवळपास आठ वर्षे होत आली आहेत. दोन वर्षांपूर्वी सिडकोकडून महापालिकेने सेवा हस्तांतरित करून घेतले आहेत. मात्र, समस्यांच्या चक्रव्यूहामध्ये पनवेलकर विशेष करून सिडको वसाहतीतील रहिवासी अडकले आहेत. आपत्ती व्यवस्थापनाचा विचार करता मनपा क्षेत्रातील नालेसफाई पूर्णपणे झालेली नाही. विशेष करून कळंबोलीमध्ये रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात येत आहे. त्याचबरोबर बाजूला पावसाळी गटारांचे काम सुरू आहे. याकरिता मोठ्या प्रमाणात खोदकाम झाले आहे. सध्या पावसाळा सुरू झाला असल्याने पावसाच्या पाण्याला निचरा होण्यासाठी जागा शिल्लक नाही. त्याचबरोबर लहान मोठे अपघात होण्याची शक्यता आहे. पथदिवे काही ठिकाणी बंद अवस्थेत आहेत. पनवेल मनपाने ठिकठिकाणी ई टॉयलेट उभारले आहेत, मात्र ते बंद अवस्थेत आहेत. त्या ठिकाणी पाण्याची सोय नसल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिसरातील जि.प. शाळांच्या इमारतीसुद्धा जीर्ण असून, महापालिकेने त्या वर्ग केलेल्या नाहीत.

### सुविधांची वानवा

**पनवेल मनपाचे माता बाल संगोपन केंद्र रखडले आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अद्यापही मार्गी लागलेला नाही. सिडकोने भूखंड न दिल्याने या केंद्राला विलंब लागला आहे. पनवेलकरांच्या दृष्टीने माता बालसंगोपन केंद्र अतिशय महत्त्वाचे आहे. यासंदर्भात आयुक्तांनी लक्ष घालावे.**

### रस्त्यांची दयनीय अवस्था

**पनवेल महापालिका हद्दीतील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. पावसाळ्यामध्ये त्याची स्थिती दयनीय होणार आहे. या पार्श्वभूमीवर युद्धपातळीवर खड्डे बुजून घेण्यात यावेत. त्याचबरोबर महानगर गॅससाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यात यावेत, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ॲड. तुषार पाटील यांनी केली.**

### क्रीडांगण आणि पार्किंगचा अभाव!

**महापालिका क्षेत्रामध्ये क्रीडांगणाचा अभाव आहे. सिडकोकडून यासाठी आरक्षित असलेले भूखंड घेऊन मुलांना खेळण्यासाठी मैदान विकसित करण्यात यावेत. त्याचबरोबर वाहनांना सार्वजनिक पार्किंगची व्यवस्था नसल्याने दुतर्फा वाहने उभे केले जातात. याबाबतही योग्य ते धोरण महापालिकेने ठरवावे, अशी मागणीसुद्धा महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.**

# पालीतील ब्रिटिशकालीन वास्तू ढासळतेय



## प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी

| पाली | वार्ताहर |

पालीत रामआळीजवळ ब्रिटिशकालीन वास्तू आहे. येथे पोलीस ठाणे, तहसील, उपलेखा कार्यालय आणि न्यायालय होते. काही वर्षांपासून ही सर्व कार्यालये बंद करून दुसरीकडे हलविण्यात आली आहेत. सध्या या वस्तूची पूर्णपणे दुरवस्था झाली आहे. शुक्रवारी (दि.२१) या वास्तूच्या रस्त्याच्या बाजूकडील भिंत पावसामुळे ढासळली आहे. सुदैवाने येथे कोणतीही दुर्घटना झाली नाही. मात्र, या मार्गावरून प्रवास करणे आता धोकादायक झाले असल्याने नगरपंचायतीमार्फत हा रस्ता बंद करण्यात आला आहे.

भिंत ढासळत असलेल्याचा व्हिडिओ येथील समाज माध्यमांवरदेखील फिरत आहे. त्यामुळे नागरिकांकडून चिंता व दुःख व्यक्त केले जात आहे. या ब्रिटिशकालीन वास्तूचे अक्षरशः खंडरमध्ये रूपांतर झाले आहे. येथील तुटलेल्या खोल्या आता मुताऱ्या झाल्या आहेत. तिथे अवैध धंदेदेखील सुरू असतात, अशी चर्चा आहे. चार वर्षांपूर्वी जुलै महिन्यात या वास्तूच्या रस्त्याच्या याच बाजूची भिंत कोसळली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अशाच प्रकारे ही जीर्ण वास्तू जर ढासळत राहिली, तर ती नामशेष होईल, तसेच दुर्घटनादेखील घडू शकते. याबाबत संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. प्रशासन याबाबत काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


> **ही वास्तु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली आहे. भिंत कोसळल्यावर सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून येथील रस्ता बंद करण्यात आलेला आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार ते पुढील कार्यवाही करणार आहेत.**
> **– प्रणाली शेळके,**
> **नगराध्यक्षा, पाली**

> **या वास्तूचे योग्य प्रकारे संरक्षण आणि संवर्धन होणे गरजेचे आहे. सतत अशाप्रकारे ही वास्तु ढासळत असेल तर दुर्घटनादेखील घडू शकते, त्यामुळे प्रशासनाने वेळीच खबरदारी घेऊन योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे.**
> **– ॲड. सचिन कारखानीस, पाली**

### ऐतिहासिक महत्त्व

**भोर संस्थानाचे संस्थानिक पंतसचिव यांच्याकडे या कार्यालयाची कारभार पाहण्याची जबाबदारी ब्रिटिशांनी दिली होती, असे इतिहास अभ्यासकांचे म्हणणे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते जवळपास २००२ ते २००३ पर्यंत येथे कोर्ट आणि पोलीस ठाणे सुरू होते. त्यावेळी या वास्तूची योग्य देखभाल आणि देखरेख होत होती. त्यांनतर मात्र येथे कोणतेच सरकारी कार्यालय राहिले नसल्याने ही ब्रिटिशकालीन ऐतिहासिक वास्तू दुर्लक्षित झाली. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात या वास्तूने कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी चोख व भक्कमपणे पार पाडली. तसेच अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. या वास्तूचा एक वेगळाच दबदबा होता. या वास्तूचे दगडी चिरेबंदी व विटांचे बांधकाम आहे. प्रशासनाचे या महत्त्वाच्या वास्तुकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे.**

# मोर्बे धरणग्रस्तांचा आक्रमक पवित्रा



## न्याय्य हक्कासाठी २७ जूनपासून उपोषणाचा इशारा

| रसायनी | वार्ताहर |

चौक मोर्बे धरणग्रस्तांवर होणाऱ्या अन्यायामुळे शासनाने आता सन २०१३ चा कायदा लागू करून न्याय देण्याचे ठरविले होते. परंतु, आजपर्यंत मोर्बे धरणास कोणताही कायदा लागू करण्यात आला नाही. तसेच ७० कोटी रुपयांचे असणारे मोर्बे धरण १९८५ साली मातीच्या नमुन्यापासून ते २००९ साली ३००० कोटीचे धरण नवी मुंबईला ५५३ कोटी रुपयांस विकण्यात आले. परंतु, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाचा कायदा लागू केला नाही. लाभ क्षेत्राचा फायदा नाही, पर्यायी जमीन नाही, उपजीविकेचे साधन नाही. याबाबत गेली ३० वर्षे पाठपुरावा करूनसुद्धा कोणताही निर्णय झाला नाही. तसेच मोर्बे प्रकल्पग्रस्तांना सामावून न घेता परस्पर बेकायदेशीरपणे हस्तांतरित केले व मोर्बे धरण प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाला, तरी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा यासाठी मोर्बे धरण प्रकल्पग्रस्त मोर्बे धरणावर २७ जूनपासून उपोषणाला बसणार असून, यानंतर आंदोलन व नवी मुंबईकडे जाणारा पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा मोर्बे धरणग्रस्तांनी दिला आहे.

तत्कालिन जिल्हाधिकाऱ्यांनी गावोगाव बैठका घेऊन प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी देण्याचे ग्रामस्थांचे ठराव घेतले. परंतु, आजपर्यंत त्याची अंमलबजावणी झाली नाही व बेकारी भत्याबाबत निर्णय झाला नाही. त्यामुळे आमची जमीन, घरे व झाडे यांची ६० टक्के केलेली वजावट चुकीची असून, त्याबावत शासनाने निर्णय घेतला नाही. त्यामुळे सन २०१३ च्या कायद्यानुसार २००९ साली नवी मुंबईबरोबर केलेल्या कराराप्रमाणे आमचे झालेले नुकसान भरून काढून भूमीहीन व बेरोजगार शेतकऱ्यांना न्याय देण्याची धरण प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे. या मागण्यांची शासनाने दखल घ्यावी, अशी मागणी मोर्बे जगन्नाथ पाटील अध्यक्ष, परशुराम मिरकुटे कार्याध्यक्ष, योगेश प्रबळकर सचिव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# ग्रामस्थांकडून उमेश पेणकरांचा जंगी सत्कार



| मुरुड जंजिरा | वार्ताहर |

उसरोली गावचे रहिवासी उमेश बाळकृष्ण पेणकर यांची एसटी महामंडळात गेले ३७ वर्षे सेवा झाली आहे. त्यांनी कंडक्टर (वाहक) म्हणून रायगड जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी ३५ वर्षे यशस्वी कामगिरी बजावली असून, गेले दोन वर्ष ते मुरुड आगार येथे वाहतूक नियंत्रक (कंट्रोल ऑफिसर) म्हणून कार्यरत असताना नियत वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत.

उसरोली येथील त्यांच्या राहत्या घरी सेवानिवृत्तीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी गावचे अध्यक्ष प्रणय धोंडसेकर व गावकऱ्यांनी त्यांचा पत्नीसमवेत शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन पुढील आयुष्य आनंदमय सुखमय निरोगी जावो, अशा शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास गावातील अनंत नांदगांवकर, सुरेंद्र पेणकर, मंगेश नांदगावकर, नितीन नांदगावकर, हिरामण नांदगावकर, सुरेश मुरूडकर, चंद्रकांत नांदगावकर, आदींसह मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# दिवेआगरचा पर्यटनदृष्ट्या विकास कधी?

## विकासाच्या दृष्टीने नव्याने उभारी कधी मिळणार?

| दिघी | वार्ताहर |

श्रीवर्धन तालुक्यातील प्रसिद्ध असणाऱ्या दिवेआगर पर्यटनस्थळाला विकसित करण्यासाठी नेहमी पाठपुरावा करण्यात येतो. मात्र, येथील अंतर्गत रस्त्यांचा परिपूर्ण विकास होणे गरजेचे असून, लोकप्रतिनिधींकडून दूरदृष्टीने पर्यटनाची संस्कृती विकसित करायला हवी, अशी मागणी दिवेआगरवासियांकडून होत आहे.

निळाशार नितांत स्वच्छ समुद्रकिनारा असलेले शहर अशी दिवेआगरची खास ओळख आहे. त्यामुळे वर्षभर स्वच्छंद फिरण्यासाठी देशी-विदेशी पर्यटकांची येथे मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळते. मात्र, पावसाळी समुद्रकिनारी जाणाऱ्या रस्त्यावर पाणी भरल्याने ये-जा होत असताना पर्यटक व स्थानिकांना चिखलातून चालावे लागते.

दिवेआगर गावातील अंतर्गत रस्त्यांचे नूतनीकरण यंदा नव्याने करण्यात आले. पर्यटनातून रोजगाराची संधी असणाऱ्या दिवेआगर क्षेत्राचा विकास करण्यात येत आहे. मात्र, गावाच्या प्रवेशाजवळ असलेल्या आदर्श सांसद गल्ली क्र. १ च्या मार्गावर समुद्रकिनारी जाणाऱ्या रस्त्यावर गेली पाच ते सहा वर्षे पाण्याचा निचरा होत नसल्याने येथील सकल भागात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे. येणाऱ्या पर्यटकांकडून याबाबत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. तरी, दिवेआगाराचा पर्यटनदृष्ट्या विकास करायचा असल्यास प्राथमिक सुविधा पुरवणे आवश्यक आहे. याकडे संबंधित प्रशासनासह लोकप्रतिनिधींनी लक्ष पुरवणे गरजेचे आहे.



> **येथील रस्त्याची खोली जास्त असल्याने पावसाचे पाणी साचले जाते. सध्या पाण्याचा निचरा करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. लवकरच चांगला दर्जेदार उंच रस्ता होऊन ही समस्या सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा सुरू आहे.**
> **– सिध्देश कोजबे, सरपंच, दिवेआगर**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# भाज्यांचे भाव भिडले गगनाला

## घरखर्च चालविण्याचे गृहिणींपुढे आव्हान



### सध्या बाजारात असलेल्या भाज्यांचे दर

**मटार २०० रु.किलो, कोबी ६० रु.किलो, फ्लॉवर ८० रु.किलो, वांगी ६० रु.किलो, टोमॅटो ८० रु.किलो, शिमला मिरची ८० रु.किलो, गवार १२० रु.किलो, घेवडा १६० रु.किलो, कोथिंबीर ४० रु.जुडी, मेथी ४० रु.जुडी, फरसबी २०० रु.किलो, गाजर ८० रु.किलो.**

| तळा | वार्ताहर |

सध्याच्या काळात सर्वच वस्तूंचे भाव वाढले असताना आता दैनंदिन लागणाऱ्या भाज्यांचे दरदेखील गगनाला भिडले आहेत. त्यामुळे घरखर्च चालविण्याचे गृहिणींपुढे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

यावर्षी सुरुवातीलाच दमदार कोसळलेल्या पावसाने धुमाकूळ घातल्याने शेतामध्ये असलेला भाजीचा माल मोठ्या प्रमाणावर कुजला आहे. परिणामी, भाज्यांची आवक कमी प्रमाणात होत असल्यामुळे भाजी मंडईत भाज्यांचे भाव चांगलेच वधारले आहेत. घाऊक व्यापाऱ्यांना पूर्वीपेक्षा जास्त किमतीने भाज्यांची खरेदी करावी लागत असल्याने परिणामी बाजारपेठेत किरकोळ भाज्यांच्या किमतीतदेखील वाढ झाली आहे. गॅस सिलिंडर, ओली, सुकी मच्छी, किराणा सामान यांच्या किमती आधीच भडकलेल्या असताना आता बाजारपेठेतील भाज्यांच्या वाढलेल्या दरामुळे गृहिणींना घरखर्च चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. यापूर्वी बाजारपेठेत गावठी भाज्यांची आवक मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे सामान्य नागरिकांना या भाज्यांचा मोठा आधार होता. परंतु, पावसाचा गावठी भाज्यांना मोठा फटका बसला असून, भाज्या कुजल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

# वढाव येथे विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

| हमरापूर | वार्ताहर |

पेण तालुक्यातील वढाव येथील बालविकास विद्यामंदिर उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू उमलले होते संस्थेचे अध्यक्ष अशोक पाटील यांच्या हस्ते शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना यावर्षीदेखील दप्तरचे वाटण्यात आली. या शाळेत वढावसह पंचक्रोशीतील विद्यार्थी मोठ्या संख्येने शिकत आहेत. सामाजिक बांधिलकी म्हणून आपण हे वाटप केल्याचे अध्यक्ष अशोक पाटील यांनी बोलताना सांगितले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tender -27 **(RFX.7000031714)** | RFx e-tender for AMC for work of repairs of 220kV Isolator, 100kV Isolator and 22kV Isolator and cable termination and joints at various substation under EHV (O&M) Division Panvel. **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST)** | **Limited to Rs.15,00,000/-** |
| Tender -28 **(RFX.7000031717)** | RFx e-tender for work of strengthening of 220kV Adlab, 220kV Apta, 100MVA, 220/100kV ICT-1 and ICT-2 LV side bay from single conductor to twin conductor at 220/100/22 kV Tambati Substation under EHV (O&M) Division Panvel . **(Tender Fee Rs. 500/- + 18% GST.)** | **Rs.21,18,162/** |

EMD 1% of estimated cost for each Tender. **Submission of bids from 24.06.2024 to 01.07.2024 up to 23:59 hrs, Opening date:-02.07.2024 @ 11:00 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The ADDL. Executive Engineer (O) Tel No. 022-27465410, Mob. No. 8530095666 E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, EHV(O&M) DN PANVEL**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000031651** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-26/ 2024-2025.** Rfx e-tender for work of extension of earthwire from tower peak to pipe type earthing to avoid transient tripping due to lightening at various locations of 220kV & 100kV Lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV(O&M)Division Panvel. **Tender amount Rs. 9,86,095/-,** **EMD amount Rs. 9,861/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **21.06.2024, 18:00 Hrs. to 30.06.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 30.06.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **01.07.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- https://srmetender.mahatransco.in
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | *Esti. Cost* |
|---|---|---|
| Tend-15/24-25 RFX 7000031695 | Work of construction of protection /revetment wall at various location of 220kV EHV lines S/Dn. Panvel under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs.28.52 Lakhs |
| Tend-16/24-25 RFX 7000031696 | Work of stub strengthening of 220kV Apta - Uran - 1 and 2 D/C line and 220kV Apta - Uran & 4 D/C line of open foundation (Normal) under EHV lines S/Dn. Panvel under EHV (O&M) Division, Panvel. | Rs.71.12 Lakhs |
| Tend-18/24-25 RFX 7000031585 | Shifiting of tower loc. No. 116 & 117 from hill top of 100kV Jite - Thal - TSS D/C line under EHV (O&M) Division Panvel. | Rs. 76.16 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 21.06.2024 to 28.06.2024 up to 11:00 hrs, Opening date:-28.06.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


# दीर्घायु हेल्थ केअर सेंटरचे उद्घाटन

| मुरुड जंजिरा | वार्ताहर |

मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील चिकणी येथील सामाजिक कार्यकर्ते भिकेश दिवेकर यांची मुलगी डॉ. मानसी दिवेकर यांच्या बोर्ली येथील दीर्घायु हेल्थ केअर सेंटरचे उद्घाटन अनंत काशिनाथ दिवेकर व अरुणा दिवेकर यांच्या हस्ते फीत कापून मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक, बोर्ली व्यापारी संघटनेचे अध्यक्ष जयवंत अंबाजी, दत्ताराम बेलोसे, नथुराम महाडिक, नरेश लाड, रुपेश बोरे, हेमंत चाळके, रमेश दिवेकर, सूर्यकांत जंगम, लहू चाचे, अंकुश चाचे, श्रीराम बेलोसे, किशोर चवरकर, आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सदर नोटीसीने सर्व संबंधितांना असे कळविण्यात की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील वैषाली विश्वनाथ काबळी. रा. झांजे नगर, ठाणे-पश्चिम, लोकमान्यनगर, पाडा क्र.-३, ठाणे. यांचा अविभक्त हिस्सा खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा लेखी करार आमचे आशिल व वैषाली विश्वनाथ काबळी यांच्या मध्ये झालेला आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरोसा मालकानी आमचे आशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे | ६१/२/२क | ०.३०.२० | ६.१९ |

वर नमुद मिळकती पैकी ०.२६.३५ हे. आर पैकी वैषाली विश्वनाथ काबळी यांच्या मालकीचे अविभक्त क्षेत्र.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसाहक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणतीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखीम आहे असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. यांची नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. २२.०६.२०२४

**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयाजवळ,
ता. अलिबाग, जि. रायगड मो. नं. ९८९००७९३०२

निवडक

## रत्नागिरी दुसऱ्यांदा अजिंक्य

**नवी दिल्ली :** किरण चोरमले(३५धावा), निखिल नाईक(नाबाद ३६) यांनी केलेल्या खेळीसह सत्यजीत बच्छाव याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर रत्नागिरी जेट्स संघाने ईगल नाशिक टायटन्स संघाचा २४ धावांनी पराभव केला. या विजयासह रत्नागिरीने सलग दुसऱ्या वर्षी एमपीएल स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. पुण्यातील गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत सुमारे पुणेकरांनी उपस्थिती लावली.

## चेंडूसाठी कोहलीची तारांबळ

**नवी दिल्ली :** यंदाच्या आयसीसी टी २० विश्वचषकातील सध्या सुपर ८ चे सामने खेळले जात आहे. आतापर्यंत एकूण ८ सुपर ८ चे सामने खेळले गेले आहेत. भारतानं यंदाच्या विश्वचषकात विजयी रथ चालूच ठेवला आहे. शनिवारी (२२ जून) रोजी भारत विरुद्ध बांग्लादेश खेळल्या गेलेल्या सामन्यात भारतानं बाजी मारली. परंतु या सामन्यादरम्यान विराट कोहली चेंडू काढण्यासाठी स्टेजच्या खाली घुसला. हा मजेशीर व्हिडिओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे.

## कमिन्सने रचला इतिहास

**नवी दिल्ली :** नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांत ६ गडी गमावून १४८ धावा केल्या. एकवेळ अफगाणिस्तान संघाने एकही विकेट न गमावता ११८ धावा केल्या होत्या. मात्र, त्यानंतर ३० धावा करताना संघाने सहा विकेट गमावल्या. पॅट कमिन्सने इतिहास रचला आहे. त्याने सलग दुसऱ्या सामन्यात हॅट्ट्रिक घेतली. याआधी कमिन्सने ऑस्ट्रेलिया विरुद्ध बांगलादेश सामन्यात हॅट्ट्रिक घेतली होती.

## अमेरिकेचा झाला पराभव

**नवी दिल्ली :** -टी २० विश्वचषक २०२४ सुपर-८ च्या सहाव्या सामन्यात वेस्ट इंडिजने अमेरिकेचा ९ गडी राखून पराभव केला आहे. यासह विंडीज उपांत्य फेरीच्या शर्यतीत कायम आहे. बार्बाडोसच्या केन्सिंग्टन ओव्हल स्टेडियमवर शनिवारी वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि अमेरिकेला १९.५ षटकांत १२८ धावांत गुंडाळले. प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजने १०.५ षटकांत एक गडी गमावून लक्ष्य गाठले.

## स्पेन बाद फेरीत

**गेल्सेनकिर्चेन :** तीन युरो चषक विजेत्या स्पेनने सलग दुसऱ्या विजयाची नोंद करत यंदाच्या युरो फुटबॉल स्पर्धेच्या बाद फेरीत प्रवेश केला. सामन्याच्या उत्तरार्धात झालेल्या स्वयंगोलच्या जोरावर स्पेनने इटलीचा १-० असा पराभव केला. स्पर्धेतील ब गटातून सलग दुसऱ्या विजयाने स्पेनने आपली आघाडी भक्कम केली आहे. स्पेनच्या खेळात तंत्रशुद्धता असली, तरी त्यांना यापेक्षा अधिक मोठा विजय मिळवता आला असता, मात्र तसे झाले नाही.

# अफगाणिस्तानचा ऑस्ट्रेलियावर ऐतिहासिक विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तान संघाने टी-२० विश्वचषकात ऑस्ट्रेलियावर मात करत इतिहास रचला आहे. रशीद खानच्या नेतृत्वाखालील या संघाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाचा पराभव केला आहे. गेल्या वर्षी झालेल्या एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये तो विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचला होता, पण मॅक्सवेलने त्याच्याकडून विजय हिसकावून घेतला. मात्र, यावेळी अफगाणिस्तानने अशी कोणतीही चूक केली नाही आणि किंग्सटाउन येथे ऑस्ट्रेलियाचा २१ धावांनी पराभव केला. या अफगाणिस्तानच्या विजयाचा खरा शिल्पकार गुलबदीन नईब ठरला .




दोन्ही संघांमध्ये एकदिवसीय आणि दोन टी-२० सामने खेळले गेले आहेत. एकदिवसीय सामन्यात अफगाणिस्तानचा संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध कधीही जिंकू शकला नाही, मात्र टी-२०च्या दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तानने ऑस्ट्रेलियाला हरवून इतिहास रचला. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने २० षटकांत ६ गडी गमावून १४८ धावा केल्या होत्या. रहमानउल्ला गुरबाजने ६० आणि इब्राहिम झाद्राननने ५१ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियन संघ १९.२. षटकांत १२७ धावांवर गारद झाला.

ॲडलेड ओव्हल या घरच्या मैदानावर खेळतानाही २०२२ टी २० विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाची अफगाणिस्तानविरुद्ध त्रेधातिरपीट उडाली होती. ऑस्ट्रेलियाने तो सामना अवघ्या ४ धावांनी जिंकला होता. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाकडून ग्लेन मॅक्सवेलने ३२ चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद ५४ धावांची दिमाखदार खेळी केली. मिचेल मार्शने ३० चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह ४५ धावा करत त्याला चांगली साथ दिली. मार्कस स्टॉइनस आणि डेव्हिड वॉर्नर यांनी प्रत्येकी २५ धावा केल्या. अफगाणिस्तानकडून नवीन उल हकने ३ तर फझलक फरुकीने २ विकेट्स पटकावल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना अफगाणिस्तानने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. रहमनुल्ला गुरबाझने ३० धावा केल्या. गुलबदीन नईबने २३ चेंडूत ३९ धावांची वेगवान खेळी केली होती. रशीद खानने २३ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ४८ धावा करत विजयश्री मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण तो अपुरा ठरला. ३२ चेंडूत ५४ धावा करणाऱ्या मॅक्सवेललाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

### ग्लेन मॅक्सवेलचे अर्धशतक ठरले व्यर्थ

**ग्लेन मॅक्सवेल (५९) व्यतिरिक्त कोणत्याही खेळाडूला १५ चा आकडा देखील स्पर्श करता आला नाही. ट्रॅव्हिस हेड (०), डेव्हिड वॉर्नर (३), कर्णधार मिचेल मार्श (१२), मार्कस स्टॉइनिस (११), टीम डेव्हिड (२), मॅथ्यू वेड (५), पॅट कमिन्स (३), ॲश्टन अगर (२) आणि ॲडम झाम्पा (९) विशेष काही करू शकला नाही. अफगाणिस्तानच्या या विजयामुळे सुपर ८ गट १ मधील उपांत्य फेरी गाठण्याची लढाई रोमांचक झाली आहे. आता ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान या दोघांचे प्रत्येकी दोन गुण झाले आहेत. ऑस्ट्रेलियाला आपला शेवटचा सुपर ८ सामना भारताविरुद्ध खेळायचा आहे तर अफगाणिस्तानला बांगलादेशविरुद्ध खेळायचे आहे. दोन्ही संघांना विजय आवश्यक आहे. दोघेही हरले तर नेट रन रेटचा खेळ रंगेल.**

वनडे विश्वचषकदरम्यान अफगाणिस्तान-ऑस्ट्रेलिया सामना क्रिकेट विश्वातल्या अद्भुत आणि अविश्वसनीय सामन्यांमध्ये गणला जातो. वानखेडे स्टेडियमवर फलंदाजीला पोषक खेळपट्टीवर अफगाणिस्तानने इब्राहिम झाद्रानच्या १२९ धावांच्या शतकी खेळीच्या जोरावर २९१ धावांची मजल मारली. झाद्राननने ८ चौकार आणि ३ षटकारांसह ही खेळी सजवली. रशीद खान (३५) आणि रहमत शाह (३०) यांनी उपयुक्त खेळी केल्या. ऑस्ट्रेलियातर्फे जोश हेझलवूडने २ विकेट्स घेतल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना ऑस्ट्रेलियाची घसरगुंडी उडाली आणि त्यांची अवस्था ९१/७ अशी होती. प्रचंड उकाडा, आर्द्रता आणि पायात येणारे गोळे या प्रतिकूल गोष्टींना पुरुन उरत ग्लेन मॅक्सवेलने अचंबित करणारी खेळी साकारली. अनेकदा वैद्यकीय उपचार घ्यावे लागलेल्या मॅक्सवेलने तीन जीवदानांचा फायदा उठवत २१ चौकार आणि १० षटकारांसह नाबाद २१० धावांची खेळी साकारली. कमिन्सने ६८ चेंडूत १२ धावांची चिवट साथ दिली. मॅक्सवेलला या थरारक खेळीसाठी सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं.

## ब्रम्हाकुमारीजच्या स्पोर्ट्स विंगकडून ऑलिम्पिक पदकाचे पूजन

**ऑलिम्पिक दिन समारंभ बाणेरमध्ये क्रीडापटूंच्या उपस्थितीत साजरा**

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

पुण्यातील ब्रम्हाकुमारीजच्या स्पोर्ट्स विंगच्या वतीने ऑलिम्पिक पदक पूजन व परिसंवादाद्वारे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

बाणेर ब्रम्हाकुमारीज सेवा केंद्रात १९३६ बर्लिन ऑलिम्पिकमध्ये पुण्याचे बाबू निमल यांनी जिंकलेल्या ऑलिम्पिक पदक पूजन करून ऑलिम्पिक दिन समारंभाची सुरूवात झाली. याप्रसंगी भारताचे पहिले पॅरा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेते मुरलीकांत पेटकर, ऑलिम्पिकपटू बालकृष्ण अकोटकर यांनी आपली ऑलिम्पिक यशोगाथा सांगितली. खेळाडूंसाठी मनाच्या शक्तीसाठी राजयोग ध्यान व सकारात्मक विचार या विषयावर बीके रितू ठक्कर, माऊटआबू येथील स्पोर्ट्स विंगचे बीके आदिती, बीके जगबीर यांची खेळाडूंना मार्गदर्शन केले. यावेळी उपसंचालक सुहास पाटील, भाग्यश्री बिले, क्रीडा संघटक अजीत निमल, दत्तात्रय कळमकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

पुण्यातील २१० राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदकविजेत्यांसह शिवछत्रपती क्रीडासंकुलातील क्रीडा प्रबोधिनीचे खेळाडू सहभागी घेतला होता. कार्यक्रमात जिम्नॉस्टिक्सची प्रात्यक्षिके उपस्थितांची मने जिंकली.

ऑलिम्पिक दिननिमित्त पुण्यात खेळाडूंसाठी प्रथमच निशुल्क ध्यान व मोटिव्हिशनल कॉन्सलिंग केंद्राचे उद्घाटन ऑलिम्पिकपटू बालकृष्ण अकोटकर यांच्या हस्ते करण्यात आले. पुण्यातील खेळाडूंना रोज संध्याकाळी ६ ते ८ यावेळात या केंद्रात मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्तविक ब्रम्हाकुमारीज बाणेर केंद्राच्या प्रमुख बीके त्रिवेणी यांनी केले. सूत्रसंचालनाचे काम बीके शुभांगी यांनी केले.




## अर्जेंटिना संघाची दमदार सुरुवात

**। ॲटलांटा । वृत्तसंस्था ।**

गतविजेत्या अर्जेंटिना संघाने यंदाच्या कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेच्या मोहिमेला विजयी सुरुवात केली. अर्जेंटिनाने स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात कॅनडाचा २-० असा पराभव केला. फुटबॉल स्पर्धेच्या इतिहासात विक्रमी सामना खेळणाऱ्या लिओनेल मेसीचा या दोन्ही गोलमध्ये वाटा होता.

पूर्वार्धात गोलशून्य बरोबरीनंतर उत्तरार्धात ज्युलियन अल्वारेझ आणि लॉटारो मार्टिनेझ यांनी अर्जेंटिनाकडून गोल केले. अर्जेंटिना संघाला २०२१ मध्ये कोपा अमेरिका आणि २०२२ मध्ये विश्वचषक स्पर्धा जिंकल्यानंतर सलग तिसऱ्या मोठ्या विजेतेपदासाठी सर्वाधिक पसंती मिळत आहे. यंदाच्या पहिल्याच सामन्याला मेसीच्या विक्रमी सहभागाची जोड होती. मेसी कोपा अमेरिका स्पर्धेतील हा ३५वा सामना होता. पूर्वार्धात कॅनडाच्या खेळात अचूकतेचा अभाव होता. गोल करण्याच्या चांगल्या संधी निर्माण



करूनही त्यांना गोल करण्यात अपयश आले. अर्जेंटिनाच्या ॲंजेल डी मारियाने आपल्या मैदानातून चेंडूवर ताबा मिळवत एकट्याने कॅनडाच्या गोलकक्षात धडक मारली होती.

उत्तरार्धात खेळायला सुरुवात झाल्यावर चारच मिनिटांत अर्जेंटिनाने संधी साधली. मेसीने मॅक ॲलिस्टरकडे पास दिला. त्याने चेंडूचा ताबा घेत खोलवर मुसंडी मारली. या चालीने कॅनडाचा गोलरक्षक मॅक्सिम स्रोपेआऊवर दडपण आले. याचा फायदा उठवून अल्वारेझने अगदी सहजपणे चेंडूला दिशा देत अर्जेंटिनाला आघाडीवर नेले. एका गोलने पिछाडीवर राहिल्यावर कॅनडाच्या खेळाडूंनी आपला खेळ उंचावण्यास सुरुवात केली होता. अशा वेळी अनुभवी मध्यरक्षक निकोलस ओटामेंडी मैदानात उतरल्यावर अर्जेंटिनाच्या बचावाला बळकटी आली.

### कोपा अमेरिका आणि मेसी

**कोपा अमेरिका स्पर्धा आणि मेसी हे एक वेगळे नाते आहे. मेसी कॅनडाविरुद्ध मैदानात उतरला तेव्हा त्याचा कोपा अमेरिका स्पर्धेतील ३५वा सामना होता. त्याने १९५३ मधील चिलीचा गोलरक्षक सर्गिओ लिव्हिंगस्टोनचा विक्रम मागे टाकला. वयाच्या २०व्या वर्षी २००७ मध्ये मेसीने पदार्पण केले आणि २०२१ मध्ये विजेतेपद मिळवले. मेसीने स्पर्धेत १३ गोल केले असून, १८ गोलसाठी सहाय्य केले आहे.**

## फलंदाजांचा कर्दनकाळ 'बुमराह एक्सप्रेस'

**२४ पैकी तब्बल २० निर्धाव चेंडू अन् ३ बळी**

**।नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ च्या सुरुवातीपासून भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने अप्रतिम कामगिरी केली. सुपर-८ मधील आपल्या पहिल्या सामन्यात त्याने अफगाणिस्तानविरूद्ध पुन्हा एकदा चमक दाखवली. त्याने त्याच्या स्पेलमधील २४ पैकी तब्बल २० चेंडू निर्धाव टाकण्याची किमया साधली. बुमराहने ४ षटकांत केववळ ७ धावा देत तीन महत्त्वाचे बळी घेतले.

दरम्यान, आयर्लंड आणि पाकिस्तानविरूद्धच्या सामन्यात बुमराह सामनावीर ठरला. विशेष बाब म्हणजे जसप्रीत बुमराहने आतापर्यंत १५ षटकांत केवळ ४ चौकार दिले असून ८ बळी घेतले आहेत.

याशिवाय त्याची सरासरी ही ३.४६ अशी राहिली. बुमराहची या विश्वचषकातील कामगिरी -२/६ विरूद्ध आयर्लंड ३/१४ विरूद्ध पाकिस्तान०/२५ विरूद्ध अमेरिका/७ विरूद्ध अफगाणिस्तानभारताची विजयी सलामी अफगाणिस्तानला नमवून भारतीय संघाने विजयी सलामी दिली.

## बजरंग पुनिया २ महिन्यांत दुसऱ्यांदा निलंबित

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नॅशनल अँटी डोपिंग एजन्सीने कुस्तीपटू बजरंग पुनियाला निलंबित केले असून त्याला नोटीसही पाठवली आहे. मार्चमध्ये सोनीपत येथे झालेल्या राष्ट्रीय चाचण्यांमध्ये बजरंग पुनियाने डोप चाचणीसाठी नमुने न दिल्याने नाडाने ही कारवाई केली आहे. नोटिशीला उत्तर देण्यासाठी बजरंग पुनियाकडे ११ जुलैपर्यंत वेळ आहे.

यापूर्वी ५ मे रोजीही नाडाने त्याला निलंबित केले होते. गेल्या वेळी जेव्हा ने बजरंगला निलंबित केले होते, तेव्हा त्याला नोटीस न बजावल्यामुळे त्याचे निलंबन शिस्तपालन समितीने मागे घेतले होते. आता नाडाने बजरंग पुनियालाही निलंबनाची नो टीस बजावली आहे. १० मार्च रोजी, ऑलिम्पिक खेळांमध्ये भाग घेण्यासाठी आशियाई पात्रता स्पर्धेच्या राष्ट्रीय चाचण्यां दरम्यान, नॅशनल अँटी डोपिंग एजन्सीने बजरंगला त्याचा नमुना देण्यास सांगितले होते. परंतु, बजरंगने नमुना देण्यास नकार दिला.

## महिला कंपाऊंड संघाची तिरंदाजीत सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय तिरंदाज ज्योती सुरेखा वेन्नम, अदिती स्वामी आणि प्रनीत कौर यांच्या कंपाऊंड महिला संघाने या वर्षी सलग तिसरा विश्वचषक जिंकला.

अंटाल्या येथे झालेल्या तिसऱ्या विश्वचषकात भारतीय कंपाऊंडने अंतिम फेरीत एस्टोनियाच्या लिसेल जात्मा, मिरी मेरीटा पास आणि मैरिस टेट्रसमन यांचा २३२-२२९ असा पराभव केला. याआधी,




भारतीय कंपाऊंड संघाने एप्रिलमध्ये शांघाय येथे झालेल्या या वर्षीच्या पहिल्या विश्वचषकात सुवर्णपदक जिंकले होते आणि मे महिन्यात येचिओन येथे झालेल्या दुसऱ्या विश्वचषकात सुवर्णपदक पटकावले होते.तिरंदाजीमध्ये दरवर्षी चार विश्वचषक होतात. यंदाचा चौथा विश्वचषक पॅरिसमध्ये होणार होता, मात्र पॅरिसमध्ये ऑलिम्पिक स्पर्धा होत असल्याने आता चौथा विश्वचषक होणार नाही. उपांत्य फेरीत तुर्कीचा केला पराभवभारताने उपांत्यपूर्व फेरीत एल साल्वाडोरचा २३५-२२७ आणि उपांत्य फेरीत यजमान तुर्कीचा २३४-२२७ असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. अंतिम फेरीत भारतीय कंपाऊंडने पहिल्या टोकाला ५८-५७ अशी आघाडी घेतली.

## कुलदीप यादवचा भेदक मारा

# भारताने केला बांगलादेशचा पराभव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने विजयासाठी १९७ धावांचे आव्हान बांगलादेशला पेलवलं नाही. भारताचा फिरकीपटू कुलदीप यादवने भेदक मारा करत बांगलादेशच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. भारताने सामना ५० धावांनी जिंकला. भारत आता सुपर ८ च्या ग्रुप १ मध्ये ४ गुणांसह अव्वल स्थानावर पोहचला आहे.बांगलादेशला २० षटकात ८ बाद १४५ धावांपर्यंतच मजल मारता आली. कुलदीपने ४ षटकात १९ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तर जसप्रीत बुमराह आणि अर्शदीपने २




विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली. हार्दिकने देखील एक एक विकेट घेत चांगला मारा केला.

भारताने बांगलादेशविरूद्धच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आक्रमक शैलीत सुरूवात केली. रोहित शर्मा आणि विराट कोहलीने ३ षटकात ३९ धावा केल्या. मात्र त्यानंतर रोहित शर्मा १० चेंडूत २३ धावा करून बाद झाला. पाठोपाठ विराट कोहली देखील ३७ धावांवर बाद झाला. सूर्याही आल्या आल्या एक षटकार मारून माघारी फिरला. भारताची अवस्था ३ बाद ७७ धावा अशी झाली. यानंतर ऋषभ पंतने भारताला शतकी मजल मारून दिली. मात्र तोही ३६ धावा करून बाद झाला.पंत बाद झाल्यानंतर हार्दिक पांड्याने डावाची सूत्रे आपल्या हातात घेतली. त्याला शिवम दुबेने ३४ धावा करून चांगली साथ दिली. या दोघांनी पाचव्या विकेटसाठी ५२ धावांची भागीदारी रचली. दुबे बाद झाल्यानंतर हार्दिक पांड्याने २७ चेंडूत नाबाद ५० धावा करत भारताला १९६ धावांपर्यंत पोहचवले. भारताने बांगलादेशचा ५० धावांनी पराभव करत सुपर ८ चा दुसरा सामना जिंकला. याचबरोबर ग्रुप १ मध्ये अव्वल स्थान पटकावलं. कुलदीप यादवनं आपल्या स्पेलमध्ये ३ विकेट्स घेत बांगलादेशच्या फलंदाजीचं कंबरड मोडलं. त्यानंतर जसप्रीत बुमराह आणि अर्शदीप सिंगनं देखील विकेट्स घेत बांगलादेशची अवस्था १६ षटकात ६ बाद ११० धावा अशी झाली होती.

## अफगाणिस्तानच्या विजयाने वाढली भारताची चिंता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तानने ट्वेंटी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८ गटात रविवारी धक्कादायक निकालाची नोंद केला. माजी विजेत्या ऑस्ट्रेलियावर त्यांनी विजय मिळवून ग्रुप १ मधील उपांत्य फेरीच्या शर्यतीची चुरस अधिक रंजक बनवली आहे. काल भारताने बांगलादेशला पराभूत करून उपांत्य फेरीच्या उंबरठ्यापर्यंत धडक दिली होती आणि त्यांचे स्थान हे निश्चित मानले जात होते. पण, अफगाणिस्तानच्या विजयाने आता समिकरण बदलले आहे आणि आता भारत आणि ऑस्ट्रेलिया या सामन्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

अफगाणिस्तानने हा विजय मिळवून ग्रुप १ मध्ये २ गुणांची कमाई केली आहे. ग्रुप १ ची सद्यस्थिती भारतीय संघ २ विजय मिळवून ४ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया व अफगाणिस्तान यांचे प्रत्येकी २ गुण आहेत, परंतु ०.२२३ नेट रन रेटसह ऑस्ट्रेलिया आघाडीवर आहे, तर अफगाणिस्तानचा -०.६५० असा नेट रन रेट आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया हा सामना दोन्ही संघांसाठी निर्णायक आहे. हा सामना भारताने जिंकल्यास उपांत्य फेरीतील त्यांचा प्रवेश पक्का होईल. पण, जर ऑस्ट्रेलियाने जिंकला, तर त्यांचेही ४ गुण होतील. अफगाणिस्तानचा शेवटचा सामना बांगलादेशविरुद्ध आहे आणि तो त्यांनी जिंकला तर त्यांचेही ४ गुण होतील. अशा परिस्थितीत नेट रन रेट महत्त्वाचा ठरेल. भारताचा नेट रन रेट हा जबरदस्त आहे आणि त्यांना उपांत्य फेरीच्या शर्यतीतून माघारी पाठवण्यासाठी ऑस्ट्रेलिया व अफगाणिस्तान यांना एकूण १२३ हून अधिक धावांनी आपापल्या साखळी फेरीत विजय मिळवावा लागेल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)